


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# अडकित्ता, चाकूने आईचा खून करत मृतदेहासमोर मुलाने खेळल्या गोट्या

## तोफखाना पोलिसांनी तासभर प्रयत्न करून दरवाजा तोडत मुलाला घेतले ताब्यात

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सावेडी उपनगरातील गुलमोहर रस्त्यावरील नवलेनगर परिसरात पोटच्या मुलानेच आईचा खून केल्याची घटना मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली. बेबी सुधाकर गवारे (वय ६०, मूळ रा. कोपरगाव, हल्ली रा.नवलेनगर) असे मयत महिलेचे नाव आहे. चाकू व अडकित्याने आईचा खून केल्यानंतर मुलगा सुहास गवारे उर्फ मामा (वय ३३) याने स्वतःला मृतदेहासोबत खोलीत कोंडून घेतले व तिथेच गोट्या खेळत होता. पोलिसांनी तासभर प्रयत्न करून दरवाजा तोडून त्याला ताब्यात घेतले. मयत गवारे या मुलाबरोबर इंगळे यांच्या घरात भाडेकरू म्हणून राहत



होत्या. त्यांच्या मुलीचे लग्न झाले होते. दुपारच्या सुमारास घरातून भांडणाचा आवाज येत असल्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, मुलाने आईला मारून स्वतःला कोंडल्याचे दिसले. तो मृतदेहाशेजारीच गोट्या खेळत होता. पोलिसांनी दरवाजा तोडून त्याला ताब्यात घेतले. मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. किरकोळ कारणातून आईला मारहाण करत भिंतीवर आपटले व चाकू व अडकित्याच्या सहाय्याने आईचा खून केल्याचे प्राथमिक माहितीवरून पुढे आले आहे. घटनेची माहिती मिळताच उपाधीक्षक दिलीप टिपरसे, पोलिस निरीक्षक जगदीश बांबळ यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर दाखल झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनी खिडकीतून त्याच्याशी संवाद साधायचा प्रयत्न केला.मात्र, त्याने दरवाजाला बेड लावून दरवाजा बंद केला होता. पोलिसांनी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केल्यावर त्याने फटीतून पोलिसांवर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. अखेर एका कर्मचाऱ्याने मिरची पूड घेऊन पाण्यात मिसळून त्याच्या दिशेने ते पाणी फेकले. त्याच दरम्यान इतर कर्मचाऱ्यांनी दरवाजा तोडून त्याला ताब्यात घेतले. सुमारे तासभर पोलिसांची कसरत सुरू होती.

मृत गवारे या लोकांच्या घरी जाऊन पोळ्या लाटण्याचे काम करायच्या. त्यांच्या मुलीचे लग्न झाले आहे. त्यामुळे मुला सोबतच त्या रहायच्या. मुलाचे वय ३३ असून वडील यापूर्वीच मयत झाले आहेत. मुलाचे लग्न होत नसल्याने व नोकरीही मिळत नसल्याने तो वैफल्यग्रस्त होता, असे समोर येत आहे.वैफल्यातून तो नशेच्या आहारी गेला होता.त्यातून त्याने आईबरोबर वाद घातले व वाद टोकाला जाऊन त्याने आईचा खून केला. दरम्यान, मयत बेबी गवारे यांच्या आईचा मागील वर्षी मृत्यू झाला होता. सोमवारी त्या वर्षश्राद्ध करून आल्या होत्या, असे समजते.

## डोळ्यात मिरची पूड टाकून तरुणीचे अपहरण

जिल्ह्यातील भिगवण शहरात भरदिवसा एका ३१ वर्षीय तरुणीचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना घडली. मंगळवारी दुपारी घडलेल्या या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर नागरिकांनी आंदोलन करत पुणे-सोलापूर महामार्ग मंगळवारी सायंकाळी काही काळ रोखून धरला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. संबंधित तरुणी तिच्या आई आणि भावासोबत दुचाकीवरून घरी जात असताना चारचाकी वाहनातून आलेल्या आरोपींनी त्यांना अडवले. अचानक हल्ला करत तरुणी, तिची आई आणि भावाच्या डोळ्यात मिरचीची पूड फेकली. त्यानंतर आई आणि भावाच्या हातावर लाकडी दांडक्याने मारहाण करण्यात आली. दोघे जखमी झाल्यानंतर आरोपींनी तरुणीला जबरदस्तीने चारचाकी वाहनात ओढून बसवले आणि घटनास्थळावरून पसार झाले. घटनेनंतर जखमी कुटुंबीयांनी भिगवण पोलीस ठाणे तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी जहीर हारून शेख आणि आयान हारून शेख यांच्याविरुद्ध अपहरण व मारहाणीचा गुन्हा नोंदवला आहे.

## थोडक्यात...

### मुंबईचा दौरा सुफल; PM मोदी रवाना

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन्ही नेते मुंबईत होते. या दोन्ही नेत्यांनी दिवसभर विविध कार्यक्रमांत सहभाग नोंदवला. संरक्षण, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा व इंडो-पॅसिफिक सहकार्याच्या पार्श्वभूमीवर हा दौरा महत्त्वाचा होता. संपूर्ण दिवस विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवल्यानंतर पंतप्रधान मोदी मुंबईतून रवाना झाले. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यावेळी उपस्थित होते. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर पंतप्रधान मोदी यांना निरोप दिला. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार हे देखील उपस्थित होते. तत्पूर्वी पंतप्रधान मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन हे गेटवे ऑफ इंडिया येथे एका विशेष कार्यक्रमात सहभागी झाले.

### पुन्हा घोषणा घुमणार

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** मराठा आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांनी अद्यापही प्रमाणपत्रांचे अपेक्षित पद्धतीने वाटप होत नसल्याबाबत पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. अधिवेशनानंतर ठोस निर्णय झाला नाही, तर पुन्हा आंदोलन उभे करण्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला असल्याचे म्हटले जात आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा केली. कॅबिनेटमध्ये हा विषय घेतो, असे आश्वासन दिले आहे. एकनाथ शिंदे आणि विखे पाटील यांनी मराठवाड्यातील सर्व मराठे कुणबी असल्याचे मान्य करून गॅझेटनुसार आरक्षण देऊ असे म्हटले होते.

# उपसचिव मिलिंद शेणॉय यांना प्रमाणपत्र वाटप भोवले!

## सरकारकडून उचलबांगडी, आदेशात काय म्हटलंय?

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याची प्रक्रिया ऑगस्ट २०२५ पासून स्थगित केली गेली होती. या खात्याचे तत्कालीन मंत्री अजित पवार यांनी हा निर्णय घेतलेला होता. मात्र, अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर पुढील काही तासांमध्येच शैक्षणिक संस्थांना ७५ अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे दिली गेली. या प्रमाणपत्रांवर उपसचिव मिलिंद शेणॉय यांची स्वाक्षरी होती. हे प्रकरण उजेडात आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याला स्थगिती दिली. चौकशी करण्याचे आदेश दिले आणि त्यानंतर आता मिलिंद शेणॉय यांची अल्पसंख्यांक विभागातून हटवण्यात आले आहे. त्यांची बदली करण्यात आली असली, तरी पुढील पद नियुक्ती केली गेलेली नाही. अल्पसंख्यांक विभागाचे तत्कालीन मंत्री अजित पवार यांनी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र वाटला स्थगिती दिलेली होती. ऑगस्ट २०२५ पासून ही स्थगिती असताना २८ जानेवारी २०२६ रोजी अजित पवारांचा बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव रुग्णालयात ठेवलेले असतानाच मंत्रालयातून शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र वाटप केली गेली होती.

ज्या शैक्षणिक संस्थांना ७५ अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रे दिली गेली होती. त्यावर उपसचिव मिलिंद शेणॉय यांची डिजिटल स्वाक्षरी होती. त्यामुळे त्यांच्याकडून ही प्रमाणपत्रे



वाटली गेल्याचे समोर आले आहे. याची गंभीर दखल घेत सरकारकडून त्यांची बदली करण्यात आली आहे.

'महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५' मधील कलम ४ (४) आणि ४(५) नुसार मिलिंद शेणॉय यांची बदली करण्यात आली आहे. प्रशासकीय कारणास्तव शेणॉय यांची बदली करण्यात आल्याचेही आदेशात म्हटले आहे. महत्त्वाचे म्हणजे मिलिंद शेणॉय यांची उपसचिव पदावरून उचलबांगडी करत असताना सरकारने त्यांची पुढील पद नियुक्ती केलेली नाही. बदलीनंतर पुढील पदस्थापनेची त्यांनी प्रतिक्षा करावी, असे आदेशात स्पष्ट केले गेले आहे. अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रे वाटप केल्याचा मुद्दा समोर आल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केला आहे. अधिकाऱ्यांनी एका-एका प्रमाणपत्रासाठी २५ लाख रुपये घेतले असल्याचे कळत आहे, असा दावा केला.

# मुस्लीम समाजाला मोठा धक्का, ५ टक्के आरक्षण रद्द, कारण काय?

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील मुस्लीम समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून एक अत्यंत मोठी बातमी समोर आली आहे. मुस्लीम समाजाला देण्यात आलेले ५ टक्के एसबीसी आरक्षण रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासंदर्भातील जुने शासन निर्णय आणि परिपत्रके तातडीने रद्द करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. अल्पसंख्याक विकास विभाग आणि सामान्य प्रशासन विभागाने १२ वर्षांपूर्वी मुस्लिम समाजातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास गटांसाठी हे आरक्षण जाहीर केले. मात्र, उच्च न्यायालयाने या आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर कायदेशीर पेच निर्माण झाला. याच पार्श्वभूमीवर सरकारने आता



हे आरक्षण पूर्णतः रद्द करण्याचा आणि त्यासंबंधीचे अध्यादेश मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. आरक्षणाचे स्वरूप: शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरती आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी मुस्लीम समाजाला 'विशेष मागास प्रवर्ग-अ' अंतर्गत ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. या आरक्षणानुसार आतापर्यंत दिले जाणारे जातीचे दाखले आणि जात वैधता प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली असून, यापूर्वीचे संबंधित शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.

# अजित पवारांच्या विमान अपघाताचे गूढ उकलणार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

> फ्लाइट डेटा रेकॉर्डरमधील माहिती डाऊनलोड करण्यात तपास संस्थेला यश

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीत झालेल्या विमान अपघाताची चौकशी विमान अपघात तपास संस्थेने (एएआयबी) सुरू केली आहे. अपघातग्रस्त विमानातील फ्लाइट डेटा रेकॉर्डरमधील माहिती यशस्वीरित्या डाऊनलोड करण्यात आल्याचे तपास संस्थेने स्पष्ट केले आहे. सर्व संबंधित घटकांनी कोणत्याही प्रकारचे तर्कवितर्क टाळावेत व प्रस्थापित कार्यपद्धतीनुसार चौकशी प्रक्रिया सुरळीतपणे पार पडू द्यावी, असे आवाहनही तपास संस्थेने केले आहे. बारामती येथे २८ जानेवारी रोजी झालेल्या लिअरजेट ४५ (व्हीटी-एसएसके) विमान अपघाताची एएआयबीमार्फत चौकशी सुरू असून, ही चौकशी आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनाच्या मानके व शिफारस केलेल्या पद्धतीनुसार काटेकोरपणे केली जात असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. अपघातग्रस्त विमानात दोन स्वतंत्र फ्लाइट रेकॉर्डर बसविण्यात आले होते. मात्र, अपघाताच्या वेळी दोन्ही रेकॉर्डर दीर्घकाळ तीव्र उष्णतेच्या संपर्कात आल्याने आगीमुळे त्यांचे मोठे नुकसान झाले. विमानातील डिजिटल फ्लाइट डेटा रेकॉर्डर एएआयबीच्या प्रयोगशाळेत यशस्वीरीत्या डाउनलोड करण्यात आला आहे. त्यामुळे अपघाताच्या आधीची उड्डाणातील तांत्रिक माहिती उपलब्ध होण्यास मदत होणार आहे, तर हनीवेल कंपनीने तयार केलेल्या कॉकपीट व्हॉइस रेकॉर्डरची सखोल तपासणी सुरू आहे.

# बोगस आयुर्वेदिक दुकानांविरोधात कारवाईची मागणी

## शिर्डीसह अनेक ठिकाणी जाळे असल्याचा आरोप



**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

कर्नाटक राज्यातील मनोज वैदू उर्फ मनोज शिर्के आणि राजेश गोराणा/खुराणा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींनी महाराष्ट्र, गुजरात व दिल्लीमध्ये बोगस आयुर्वेदिक औषधांच्या दुकानांचे जाळे उभारल्याचा गंभीर आरोप करण्यात येत असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

माहितीनुसार, संबंधित व्यक्तींविरुद्ध शिर्डी तसेच राज्यातील इतर पोलीस ठाण्यांमध्ये अनेक गुन्हे दाखल असल्याचे सांगितले जात आहे. नाशिकमध्येही दोन महिन्यांपूर्वी गुन्हे नोंद झाल्याची माहिती समोर येत आहे. वेगवेगळी नावे व ओळखपत्रे वापरून दुकानांची नावे बदलत हा व्यवसाय सुरू ठेवला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

शिर्डी, सांगली, सातारा, कोल्हापूर, नाशिक आदी ठिकाणी अशा प्रकारची दुकाने सुरू असल्याचे सांगितले



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

जात असून काही ठिकाणी दुकाने सील केल्यानंतर पुन्हा नव्या नावाने सुरू होत असल्याची चर्चा आहे. मंदिर परिसर, रुग्णालय परिसर व बसस्थानकाजवळ एजंटमार्फत आजारी व त्रस्त व्यक्तींना संपर्क करून औषधांची विक्री केली जात असल्याचेही आरोप करण्यात आले आहेत.

या प्रकरणात काही स्थानिक गुंड तसेच काही व्यक्तींच्या संगनमताचा संशय व्यक्त केला जात असून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. श्रीरामपूर विभागाचे पोलीस उपाधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी या प्रकरणात लक्ष घालून कारवाई करावी, असेही नागरिकांचे म्हणणे आहे.

तसेच बनावट ओळखपत्रे वापरून आणि विविध नावांनी व्यवसाय चालवला जात असल्याचा आरोप करण्यात आला असून अनेक रुग्णांची फसवणूक झाल्याचेही सांगितले जात आहे. काही ठिकाणी भिक्षा मागणाऱ्या मुलांमार्फत पैसे गोळा करणे, तसेच इतर व्यवसायांशी संबंधित व्यवहार सुरू असल्याचेही आरोप पुढे येत आहेत.


राज्याचे गृहमंत्री यांनी या संपूर्ण प्रकरणाची दखल घेऊन संबंधितांवर आणि संगनमताचा संशय असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दोषींवर कठोर कारवाई होऊन बोगस औषधांच्या व्यवसायाला आळा बसावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शीतल तेजवानी आणि रवींद्र तारुचा जामीन फेटाळला

## मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मुंढवा येथील चाळीस एकर सरकारी जमीन परस्पर अमेडिया कंपनीला विकताना कोट्यवधींचे मुद्रांक शुल्क चुकवून सरकारची फसवणूक केल्याप्रकरणातील आरोपींची गुन्ह्यातील सक्रिय भूमिका, सरकारी जमिनीशी संबंधित गुन्ह्याचे गंभीर स्वरुप आणि २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क चुकविले हे लक्षात आल्यावर त्यांना जामीन देता येणार नाही. शीतल तेजवानी महिला आहे, हा जामीन देण्याचा आधार ठरू शकत नाही; तर रवींद्र तारू याने सरकारी जमिनीच्या दस्त नोंदणीवेळी खरी माहिती लपवून गुन्ह्यात मदत केली, अशी निरीक्षणे नोंदवित अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी मुख्य आरोपी शीतल तेजवानी आणि तत्कालीन सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांचा जामीन अर्ज फेटाळला. या प्रकरणात शीतल किसनचंद तेजवानी, अमेडिया कंपनीचा संचालक दिग्विजय पाटील आणि तत्कालीन सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांच्याविरोधात बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तेजवानी आणि तारू यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे;




तर दिग्विजय पाटील याच्याविरोधात तपास अद्याप प्रलंबित आहे. या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असलेल्या तेजवानी आणि तारू यांनी जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केला. त्याला प्रमुख जिल्हा सरकारी वकील प्रमोद बोंबटकर यांनी विरोध केला. दरम्यान, मुंढवा येथील जमीन भारतीय वनस्पतीशास्त्र सर्वेक्षण या सरकारी संस्थेच्या मालकीची असताना, तेजवानीने परस्पर अमेडिया कंपनीला ३०० कोटी रुपयांना विकली.

# बलात्कार पीडितेस गर्भ पाडण्याची परवानगी

## प्रजनन स्वातंत्र्य हे सर्वोच्च मानत हायकोर्टाचा निर्णय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

बलात्कार पीडित अल्पवयीन मुलीला ३१ आठवड्यांची गर्भधारणा वैद्यकीयदृष्ट्या समाप्त करण्यास उच्च न्यायालयाने मंगळवारी परवानगी दिली. प्रजनन स्वातंत्र्य हे सर्वोच्च मानत, न्यायालयाने स्पष्ट केले की, कोणतेही न्यायालय महिलेला विशेषत: अल्पवयीन मुलीला अनैच्छिक गर्भधारणा पूर्ण करण्यास भाग पाडू शकत नाही. न्यायालयाने नमूद केले की, संबंधित गर्भधारणा एमआरटीपीअंतर्गत निश्चित केलेल्या २४ आठवड्यांच्या मर्यादेपेक्षा अधिक आहे. मात्र, ही गर्भधारणा लैंगिक अत्याचारामुळे आहे. गर्भधारणेचा पूर्ण कालावधी पूर्ण करून मूल जन्माला घालण्यास नकार देण्याचा माझा स्वायत्त



हक्क आहे, अशी ठाम भूमिका पीडितेने घेतली आहे, असे न्यायालयाने म्हटले. न्यायालयाने आईच्या लेखी संमतीच्या अधीन राहून व वैद्यकीय खबरदारी घेऊन गर्भपातास परवानगी दिली. आधी निवडणुकीत बाजी अन् आता PM मोदींच्या स्वागताची संधी; नगसेविका तेजस्वी घोसाळकर म्हणाल्या... निर्णय देताना खंडपीठाने अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निकालाचा हवाला दिला. त्या प्रकरणातही मुंबईतील एका अल्पवयीन मुलीला ३० आठवड्यांची गर्भधारणा वैद्यकीयदृष्ट्या समाप्त करण्यास परवानगी देण्यात आली होती. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने महिलांच्या प्रजनन स्वातंत्र्याला सर्वोच्च प्राधान्य दिले होते. याआधी ठाणे जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय मंडळाने २४ आठवड्यांहून अधिक गर्भधारणेबाबत शिफारस किंवा विरोध करण्याचे टाळले होते. १७ फेब्रुवारीच्या नव्या निवेदनात मंडळाने अशा प्रकरणांत अंतिम निर्णयासाठी न्यायालयीन आदेशांची आवश्यकता असल्याचे नमूद केले.

# महाशिवरात्र निमित्त मवेशीत अखंड हरिनाम सप्ताह संपन्न

## भक्तीबरोबर पर्यावरणाचा प्रेरणादायी संदेश!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

श्री क्षेत्र मवेशी, बारववाडी (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) – महाशिवरात्र निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला. टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि हरिनामाच्या अखंड गजरात संपूर्ण गाव आध्यात्मिक वातावरणात रंगून गेले होते.

सप्ताह सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन सप्ताह व्यवस्थापन समितीने केले. आत्मलिंगेश्वर ट्रस्ट नियोजित कार्यकारिणीचे अध्यक्ष आयुर्वेदाचार्य बाळानंद सरस्वती महाराज, सचिव भास्कर भांगरे, खजिनदार निवृत्ती बुधाजी गवारी तसेच सर्व विश्वस्तांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच मवेशी ग्राम सुधार संघ, मुलुंड (मुंबई) यांच्या कार्यकारिणीचेही उल्लेखनीय योगदान लाभले.

या सप्ताहात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा ह.भ.प. पांडुरंग महाराज भांगरे व दौलत महाराज बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हरिपाठ व काकडा भजनासह संपन्न झाला. गावचे सरपंच यमाजी भांगरे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच मवेशी परिसरातील सर्व वाडी-वस्ती आणि शाळांनी सक्रिय सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

या सप्ताहाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे कीर्तनातून देण्यात आलेला पर्यावरण संवर्धनाचा ठाम आणि जागरूक करणारा संदेश.

"जंगलांना वनवा लावू नका", "प्लास्टिकमुक्त गाव करा", "झाडे लावा – देश वाचवा" अशा प्रभावी आवाहनातून समाजात जनजागृती करण्यात आली. राष्ट्राच्या ऑक्सिजन निर्मितीत प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले.

सप्ताहात कीर्तन सेवा देणाऱ्यांमध्ये दत्तात्रेय महाराज धुमाळ, केशव महाराज बागडे, शारदा ताई सूर्यवंशी, सुनील महाराज मंगळापुरकर, राजेंद्र महाराज येवले, चंद्रकांत घोडे महाराज, दत्ता महाराज लांगी, पूज़ाताई कोंडार आणि बाळासाहेब महाराज गतीर यांनी प्रभावी कीर्तनातून समाजप्रबोधन केले.

विशेष म्हणजे पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांनी आठ दिवस प्रत्येक कीर्तनकारांचा सत्कार केशर आंब्याचे रोप व कापडी पिशवी देऊन केला. पारंपरिक हाराऐवजी झाड देण्याच्या या अभिनव उपक्रमामुळे उपस्थित भाविकांमध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक आणि कृतीशील प्रेरणा निर्माण झाली. "हार काही तासांत कोमेजतो; पण झाड आयुष्यभर जगते," या संदेशातून भक्ती आणि पर्यावरणाचा सुंदर संगम घडवून आणण्यात आला.

मवेशीतील हा सप्ताह केवळ धार्मिक सोहळा न राहता पर्यावरण जनजागृतीची प्रेरणादायी चळवळ ठरला आहे. गावागावात अशा उपक्रमांची अंमलबजावणी झाल्यास हरित, स्वच्छ आणि जागरूक समाजनिर्मितीस मोठी चालना मिळू शकते, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पर्यावरण शिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक वनीकरण विभाग, ठाणे यांच्या वतीने शेठ एन.के. टी.टी. इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पर्यावरण शिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने करण्यात आली.




विद्यार्थ्यांनी पथनाट्य, गीत व नृत्याच्या माध्यमातून पर्यावरणाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. तसेच विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक आकर्षक भिंतीचित्रे साकारली आणि टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ व उपयुक्त साहित्य तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी विभागीय वनअधिकारी श्रीमती रामेश्वरी बोंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "आजची पिढी पर्यावरण जपेल तरच उद्याचे भविष्य सुरक्षित राहील," असा संदेश दिला. तसेच विद्यार्थ्यांनी अधिकाधिक पुस्तकांचे वाचन करावे आणि मोबाईलपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यांनी सांगितले.

शाळेच्या प्राचार्या सौ. लिडिया सालियन यांनी पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करताना, आपण पर्यावरणाचे रक्षण केले तर ते देखील आपले संगोपन करेल, असे मत व्यक्त केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व ज्ञानवर्धक ठरला. उपस्थितांनी "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश आचरणात आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले आणि 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# "आळंदीकरांच्या मूलभूत समस्या सोडवून तिर्थक्षेत्राला 'विकासाचे रोल मॉडेल' बनवणार" — आ. महेश लांडगे

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

"आळंदीकरांच्या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवून स्वच्छ, सुबक आणि विकसित आळंदी घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली श्रीक्षेत्र आळंदीत ज्ञानपीठाची पायाभरणी होत आहे. नव्या पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची ही पुण्यभूमी विकासाचे रोल मॉडेल ठरेल," असा ठाम विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.



श्रीक्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्र परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी नवनियुक्त लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक आमदार लांडगे यांच्या उपस्थितीत पार पडली. शहरातील प्रलंबित नागरी प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. नियमित व सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी विशेष नियोजन, शहर स्वच्छतेसाठी सक्षम यंत्रणा उभारणे, बंद पथदिव्यांची तातडीने दुरुस्ती, सांडपाणी वाहिन्यांबाबतच्या तक्रारींचे त्वरित निवारण तसेच खराब रस्त्यांची डागडुजी या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. प्रलंबित विकास प्रस्तावांचा आढावा घेत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

बैठकीस नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, गटनेते सचिन गिलबिले तसेच सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

# आजपासून पुण्यात 'लेन्सकेप केरळ' छायाचित्र प्रदर्शन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

'केरळ टुरिझम' तर्फे 'लेन्सकेप केरळ' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. आजपासून सुरु होणाऱ्या या प्रदर्शनात दहा नामवंत छायाचित्रकारांनी संपूर्ण केरळमध्ये टिपलेल्या १०० निवडक छायाचित्रांचा संग्रह सादर केला जाणार आहे. केरळमधील लोकांचे वैविध्यपूर्ण जीवन, संस्कृती, निसर्गसौंदर्य, वन्यजीव आणि दैनंदिन क्षण अशा विविध विषयांना या प्रदर्शनात स्थान देण्यात आले आहे. दहा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून साकारलेले हे प्रदर्शन 'गॉड्स ओन कंट्री' म्हणजेच केरळचे एक चैतन्यमय आणि आधुनिक रूप प्रेक्षकांसमोर उभे करते.

# २ दिवसीय एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**संगमनेरखुर्द : (समर्थ गांवकरी)**

निमगाव बु., ता. संगमनेर, जिल्हा-अहिल्यानगर येथे केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या केंद्रिय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र नाशिकच्या वतीने रब्बी हंगाम २०२५-२६ साठी दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान दोन दिवसीय एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा उद्घाटन समारोह गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये थाटामाटात पार पडला.



सदर प्रशिक्षण कार्यक्रमाला एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्राचे उप निदेशक डॉ. अतुल ठाकरे यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर मार्गदर्शन करून प्रतिपादन केले की, रासायनिक कीटकनाशकांच्या अशास्त्रीय व वारेमाप वापरामुळे मानवी आरोग्य व शेतीच्या जैवविविधतेवर मोठ्या प्रमाणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, त्याचबरोबर उत्पादन खर्चातही खुप वाढ झालेली आहे. यातून शेतकऱ्यांना बाहेर पडायचे असेल तर कीड व रोगांच्या प्रभावी नियंत्रणासाठी एकत्मिक कीड व्यवस्थापनाचा अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे यासाठी मशगतीय, यांत्रिक, जैविक व रासायनिक या सर्व पध्दतींचा एकत्रित वापर केल्यास कीड व रोगंचे प्रभावी नियंत्रण तर होतेच त्याच बरोबर फक्त रासायनिक कीटकनाशकांवर असणारे अवलंबित्व कमी होऊन उत्पादन खर्चामध्येही बचत होते.

गावचे सरपंच सोमनाथ कानवडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाला उपसंचालक डॉ . अतुल ठाकरे, वनस्पती संरक्षण अधिकारी डॉ शरद गायकवाड, सहायक वनस्पती संरक्षण अधिकारी, ऋषिकेश मानकर, विशाल काशीद व राज्य कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे, सहा. कृषी अधिकारी विजय शेलार तसेच गावातील प्रतिष्ठित खंडू कानवडे, पोलिस पाटील राजेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये विविध तज्ञांचे मार्गदर्शन लाभले, यामध्ये भाजीपाला तसेच मका आणि इतर पिकावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले,

कार्यक्रमस्थळी विविध प्रकारचे सापळे, जैविक कीटकनाशके व फवारणी करताना वापरावयाच्या सुरक्षासाधनांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.यासही शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.

एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्राचे अधिकारी यांनी प्रक्षेत्र भेटी दरम्यान शेतकऱ्यांना कीड व रोगांचे निरीक्षण करून करावयाच्या उपाय योजनांची माहिती करून दिली. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास निमगाव शिवारातील शेतकरीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

# शाळेने दिलेल्या संस्कारांची परतफेड करण्याची हीच योग्य वेळ

## मा. अध्यक्ष बाबासाहेब भोस

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, घोगरगाव येथे माजी विद्यार्थी संघटनेच्या नोंदणी प्रक्रियेसंदर्भात आयोजित सहविचार सभा उत्साहात पार पडली. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थिती लावली. सभेच्या अध्यक्षस्थानी जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस होते. यावेळी बोलताना त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक चळवळीचा वारसा जपण्यासाठी आणि तो अधिक व्यापक करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी संघटित होणे काळाची गरज असल्याचे नमूद केले. "शाळेने दिलेल्या संस्कारांची परतफेड करण्याची हीच योग्य वेळ आहे. संघटनेच्या माध्यमातून आपण विद्यालयाच्या प्रगतीत थेट आणि सकारात्मक योगदान देऊ शकतो," असे त्यांनी स्पष्ट केले.



प्राचार्य वसंत नरवडे यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या स्थापनेमागील उद्दिष्टे स्पष्ट करताना सांगितले की, माजी विद्यार्थ्यांचे विद्यालयाशी आपुलकीचे स्नेहबंध कायम राहावेत, ही या उपक्रमामागील मूलभूत भावना आहे. विद्यालयाची आर्थिक बळकटी, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, वैचारिक समृद्धी तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्यासाठी संघटना प्रभावी व्यासपीठ ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शैक्षणिक, सामाजिक आणि विकासात्मक उपक्रम राबवून विद्यालयाचा संतुलित सर्वांगीण विकास साधण्याचा मानसही त्यांनी यावेळी मांडला. सभेस सरपंच सुजाता भोसले, उपसरपंच डॉ. दिलीप भोस, राजेंद्र उगले, बिभीषण उगले, सेवानिवृत्त प्राचार्य अविनाश गांगर्डे, अर्जुन उगले गुरुजी, पत्रकार उज्वलाताई उल्हारे, डॉ. सुधीर गुंजाळ, दिलीप जाधव, भगवान साळुंके, कृषी सहाय्यक मिलिंद भोसले, समीर शेख गुरुजी, आदिक उगले, महेश बोरुडे, प्रवीण लुणिया, आदिल शेख आदी मान्यवर माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सहविचार सभेत माजी विद्यार्थी संघटनेची अधिकृत स्थापना व नोंदणी करण्याचा ठोस निर्णय घेण्यात आला. लवकरच कार्यकारिणी जाहीर करून पुढील कार्ययोजना निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यालयाच्या आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक आणि सुरक्षा क्षेत्रांत संतुलित प्रगती साध्य होऊन सर्वांगीण विकासाला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# वेंकटेश पोदार लर्न स्कूलचे विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत शास्त्रंग मार्शल आर्ट प्रकारात श्रीगोंदा येथील वेंकटेश पोदार लर्न स्कूल च्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय क्रीडा संकुलात दि. १६ व १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडत असलेल्या या स्पर्धेत राज्यभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. १९ वर्षांखालील गटात झालेल्या लढतींमध्ये वेंकटेश पोदार स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवले. १९ वर्षांखालील मुली गटात ईशा संतोष गोरे हिने दमदार खेळ करत सुवर्णपदक पटकावले. तसेच १९ वर्षांखालील मुले गटात सम्राटराजे चांगदेव पाचपुते याने कांस्यपदक मिळवून शाळेचा गौरव वाढवला.

# संविधान, न्याय आणि संघर्षाची कहाणी...

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

संविधानाची ताकद, कायद्याची धार आणि अन्यायाविरोधातील लढ्याची धग यांचा संगम असलेला कलम का बादशाह हा नवा मराठी सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. निर्माता व्हि. एम. भैलुमे आणि दिग्दर्शक आनंदकुमार सरवदे यांच्या टीमने साकारलेला हा चित्रपट सामाजिक आशय, थरार आणि विचारप्रवर्तक कथानक यामुळे चर्चेत आला आहे.




सत्तेला प्रश्न विचारणारी आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभा राहणारी ही कथा 'दीक्षा' आणि 'जय' या दोन तरुणांच्या संघर्षाभोवती फिरते. अन्याय, भीती आणि सत्तेच्या दबावासमोर न झुकता ते संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या आधारे लढा उभारतात. कायदा हेच त्यांचे शस्त्र ठरते, तर धैर्य ही त्यांची खरी ताकद बनते. व्यवस्थेतील त्रुटींना भिडणारी ही कथा केवळ मनोरंजनापुरती न राहता समाजाला विचार करायला भाग पाडणारी ठरते. चित्रपटात अभिनेत्री मोनालिसा बागल, यश डिंबळे, आनंद शिंदे आणि जय मोर्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत. २०२३ मधील 'रावरंभा' नंतर काही काळ पडद्यापासून दूर राहिलेली मोनालिसा बागल 'कलम का बादशाह' मधून पुन्हा एकदा दमदार भूमिकेत दिसणार असून तिच्या कमबॅककडे प्रेक्षकांचे विशेष लक्ष लागले आहे. अभिनयातील प्रामाणिकता, भावनांची प्रभावी अभिव्यक्ती आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण ही तिची ओळख पुन्हा एकदा या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. आर. बी. फिल्म्स प्रॉडक्शनच्या बॅनरखाली साकारलेल्या या सिनेमाचे छायाचित्रण मनीष वि. सोनी यांनी केले असून पटकथा व संवाद कल्पेश जगताप यांनी लिहिले आहेत. संविधानाच्या मूल्यांवर आधारित आशय, प्रभावी अभिनय आणि सशक्त मांडणीमुळे 'कलम का बादशाह' हा सिनेमा प्रेक्षकांसाठी वेगळा अनुभव ठरणार आहे. मनोरंजनासोबतच समाजाला प्रश्न विचारायला भाग पाडणारा आणि न्यायासाठी उभे राहण्याची प्रेरणा देणारा हा चित्रपट लवकरच आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

# शिर्डीत साईकृपा आयुर्वेदिक दुकान सील

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

शिर्डी शहरातील ताजीम खान बाबा चौक येथे असलेले 'साईकृपा आयुर्वेदिक' हे दुकान प्रशासनाने सील केले आहे. साईभक्ताची फसवणूक केल्याच्या तक्रारीवरून संबंधितांवर कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, आयुर्वेदिक उपचारांच्या नावाखाली आर्थिक गंडा घालण्यात आल्याची तक्रार समोर आली होती. त्यानंतर संबंधित विभागाने तपास करून दुकानावर सीलची कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी आयुर्वेदिक उपचारांच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करणाऱ्या इतर दुकानांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. "आयुर्वेद" या नावाचा गैरवापर करून भाविक व नागरिकांची दिशाभूल करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने मोहीम राबवावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.




साईभक्ताची फसवणूक प्रकरणी कारवाई!

# सुरक्षितता, अनुपालन आणि शाश्वत पद्धतींसाठी 'सक्षम' उपक्रमाची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुण्यातील फूड सर्व्हिस आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्र नव्या फॉरमॅट्समुळे वेगाने विस्तारत असताना सुरक्षित कार्यपद्धती, नियमांचे पालन आणि शाश्वत पायाभूत सुविधा यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर कमर्शियल रेफ्रिजरेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एलनप्रोने 'सक्षम' या ज्ञानाधारित उद्योग उपक्रमाच्या पुणे आवृत्तीची घोषणा केली. पत्रकार परिषदेत उपक्रमाचे उद्दिष्ट, उद्योगासाठीचे महत्त्व आणि अपेक्षित परिणाम याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी एलनप्रोचे संचालक संजय जैन, हॉस्पिटॅलिटी कन्सल्टंट्स फोरमचे अध्यक्ष पी. श्रवण कुमार तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. तज्ज्ञांच्या मते,




## एलनप्रोचा ज्ञानाधारित उद्योग उपक्रम; फूड सेफ्टी आणि ऑपरेशनल मानकांवर विशेष भर

फूड व्यवसाय झपाट्याने वाढत असला तरी तापमान नियंत्रण, रेफ्रिजरेशन देखभाल आणि ऑडिट तयारी यांसारख्या महत्त्वाच्या बाबींमध्ये सातत्याचा अभाव दिसून येतो. यामुळे अन्नसुरक्षेचे धोके, अनावश्यक नुकसान आणि आर्थिक ताण वाढण्याची शक्यता असते.

'सक्षम' पुणे अंतर्गत शेफ, हॉटेल इंजिनिअर्स, फूड बिझनेस ऑपरेटर्स, फॅसिलिटी मॅनेजर्स आणि अनुपालन तज्ज्ञांसाठी मार्गदर्शित सत्रे आणि उद्योग संवाद आयोजित करण्यात येणार आहेत. ही सत्रे प्रत्यक्ष कामकाजातील अडचणी व उपायांवर आधारित असतील.

- ▲ एकदिवसीय कार्यक्रमात तीन प्रमुख विषयांवर भर असेल
- ▲ फूड सेफ्टी आणि स्वच्छता अनुपालन तयारी
- ▲ शाश्वत हॉस्पिटॅलिटी संचालन

तापमान व्यवस्थापन, अन्नाच्या गुणवत्तेत रेफ्रिजरेशनची भूमिका, प्रिव्हेंटिव्ह मेंटेनन्स, किचन रिस्क कंट्रोल, ग्रीस व वेस्टवॉटर व्यवस्थापन, तसेच नियमांचे पालन न केल्यास होणारे आर्थिक परिणाम यावर सविस्तर चर्चा होणार आहे. पॅनेल चर्चांमधून उपकरणांची निवड आणि SOP चा सुरक्षिततेवर होणारा परिणामही स्पष्ट केला जाणार आहे.

संजय जैन म्हणाले, "फूड व्यवसाय मोठ्या प्रमाणात आणि वेगाने वाढत आहे. सुरक्षित व टिकाऊ वाढीसाठी मजबूत कार्यप्रणाली आणि योग्य तांत्रिक निर्णय अत्यावश्यक आहेत. 'सक्षम' चा उद्देश म्हणजे उद्योग मानके प्रत्यक्ष कामात कशी उतरवायची याचे व्यवहार्य मार्गदर्शन देणे." पी. श्रवण कुमार म्हणाले, "उद्योग वाढत असताना फूड सेफ्टी आणि अनुपालनाची मूलभूत समज अधिक मजबूत होणे गरजेचे आहे. 'सक्षम' सारखे ज्ञान मंच व्यावसायिक मानके उंचावण्यास मदत करतात."

पत्रकार परिषदेत हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, क्लाऊड किचन, फूड रिटेल आणि क्विक कॉमर्स डार्क स्टोअर्समध्ये अन्नसुरक्षा, ऑडिट अनुपालन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी कमर्शियल रेफ्रिजरेशन प्रणाली किती महत्त्वाची ठरत आहे, यावरही भर देण्यात आला.

कंपनीकडून कोल्ड रूम्स, वापरानुसार डिझाइन केलेल्या कूलिंग सोल्यूशन्स आणि ऊर्जा बचत करणाऱ्या प्रणाली उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती देण्यात आली.

# अवैध दारू वाहतूक करणारी स्विफ्ट डिझायर जप्त

## ४.८१ लाखांचा मुद्देमाल हस्तगत!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या वतीने अकोले पोलीस ठाणे हद्दीत अवैध दारू वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार धामणगाव पाट ते कोतुळ मार्गावर सापळा रचून स्विफ्ट डिझायर कारसह दारूचा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईत एकूण ४,८१,९५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर कार्यालयाचे सोमनाथ वाघचौरे यांनी अकोले पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस पथक पेट्रोलिंग करत असताना पो.हे. कॉ. दादासाहेब लोढे यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच ०५ बीएक्स ५६३५) या वाहनातून दारूची वाहतूक होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पोलीस पथकाने कोतुळ दुरक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना सोबत घेत धामणगाव पाट ते कोतुळ रोडवरील हायटेक नर्सरी परिसरात सापळा लावला. सकाळी सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास संशयित वाहन येताना दिसताच पोलिसांनी गाडी थांबवली. वाहनात दोन इसम आढळून आले. चौकशीअंती चालकाने आपले नाव अक्षय मारुती वाकचौरे (वय २६, रा. परखतपूर, ता. अकोले) तर सोबतच्या इसमाने राजेंद्र बाळासाहेब तांबे (वय ३०, रा. पेमगिरी, ता. संगमनेर) असे सांगितले.

गाडीची पंचासमक्ष झडती घेतली असता ६१,९५० रुपये किंमतीच्या 'देशी बॉबी संत्रा' कंपनीच्या ९२४ बाटल्या आढळून आल्या. संबंधितांकडे वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे निष्पन्न झाले.


दारूचा साठा, स्विफ्ट डिझायर कार व दोन मोबाईल असा एकूण ४,८१,९५० रुपये किंमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. चौकशीत सदर दारू संगमनेर येथील अभिजीत रणशुर याच्याकडून खरेदी केल्याची कबुली आरोपीने दिली असून तो सध्या फरार आहे.

या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७८/२०२६ अन्वये महाराष्ट्र प्रोहिबिशन कायद्याच्या कलम ६५ (अ), (ई), ८३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी संगमनेर, अकोले पोलीस निरीक्षक मोहन बोरसे आणि त्यांच्या पथकाने संयुक्तरीत्या केली. पुढील तपास अकोले पोलीस ठाणे करीत आहे.

# श्री संत शेख महंमद महाराजांचा ३२७ वा संजीवन समाधी सोहळा

■ भव्य गाथा पारायण व यात्रा महोत्सवाचे आयोजन



**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

वै. ह.भ.प. तात्या महाराज महापुरुष यांच्या कृपाशिर्वादाने श्री संत शेख महंमद महाराज यांच्या ३२७ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात भव्य श्री तुकाराम गाथा व 'योगसंग्राम' ग्रंथ पारायण सोहळा बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार असल्याची माहिती यात्रा कमेटीचे अध्यक्ष गोपाल मोटे पाटील यांनी दिली. फाल्गुन शुद्ध १, बुधवार दि. १८/०२/२०२६ ते फाल्गुन शुद्ध ९, बुधवार दि. २५/०२/२०२६ या कालावधीत दररोज रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत कीर्तन, पारायण, भजन व प्रवचन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

कीर्तनसेवा पुढीलप्रमाणे होणार आहे –

दि. १८ रोजी ह.भ.प. भूषण महाराज महापुरुष (प्रल्हाद महाराजांचे ११ वे वंशज),

दि. १९ रोजी ह.भ.प. तुकाराम महाराज मुंढे (बीड),

दि. २० रोजी भगीरथ महाराज काळे,

दि. २१ रोजी ह.भ.प. भावार्थ महाराज देखणे (प्रमुख विश्वस्त, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी), दि. २२ रोजी ह.भ.प. सिद्धीनाथ महाराज मेटे (अध्यक्ष, संत शेख महंमद महाराज प्रतिष्ठान, श्री क्षेत्र वाहिरा),दि. २३ रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील (भिवंडी),

दि. २४ रोजी ह.भ.प. अनिल महाराज पाटील (बार्शीकर) यांचे हरिकीर्तन होणार आहे. प्रवचनकार म्हणून ह.भ.प. दत्तात्रय महाराज खेडकर, ह.भ.प. विठ्ठल महाराज खेडकर, ह.भ.प. सुभाष महाराज आळेकर, ह.भ.प. एकनाथ महाराज कांडेकर, ह.भ.प. सुखदेव महाराज ननवरे, ह.भ.प. रमेश महाराज वाळूज (पुणे), ह.भ.प. घनश्याम (आण्णा) शेलार, निजामभाई शेख व भगवान महाराज गिरमकर यांची उपस्थिती लाभणार आहे.

# सुकुरवाडी बस स्थानकावर अवैध प्रकार

## प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र राज्य परिवहन अंतर्गत येणाऱ्या सुकुरवाडी बस स्थानकात अत्यंत गंभीर प्रकार घडत असल्याचे समोर आले आहे. बस स्थानकाच्या आवारात काही व्यक्तींमार्फत उघडपणे गांजा व दारूचे सेवन होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

दररोज हजारो प्रवासी, महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक या स्थानकावरून प्रवास करतात. अशा परिस्थितीत सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या नशेखोरीमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः महिला व लहान मुलांसाठी हे वातावरण कितपत सुरक्षित आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रशासन व पोलिसांनी तात्काळ कारवाई करून बस स्थानक परिसरातील अवैध प्रकारांना आळा घालावा, अन्यथा एखादी अनुचित घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, असा इशाराही प्रवाशांनी दिला आहे.

# सात जणांची निर्दोष सुटका

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक ७ श्री. तायडे यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात, शासकीय कामात अडथळा आणल्याचा आरोप असलेल्या माजी नगरसेवक नजू पैलवान, रशीद दंडा, एजाज चीची यांच्यासह एकूण सात जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. हा निकाल १६ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झाला. प्रकरणाची पार्श्वभूमी कोतवाली पोलीस स्टेशनकडून दाखल करण्यात आलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांकात, तोफखाना पोलीस स्टेशनमधील 'हरार' आरोपी रशीद दंडा याला अटक करण्यासाठी कोतवाली पोलिसांची टीम गेली असता, उपस्थित आरोपींनी अटक प्रक्रियेत अडथळा आणल्याचा आरोप करण्यात आला होता.

# वीज प्रश्नी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

## लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यात सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाविरोधात तसेच शेती पंपांना दिवसा व पूर्णदाबाने वीज पुरवठा मिळावा या मागण्यांसाठी जि.प. सदस्य अनिल ठवाळ व पं.स. सदस्या अनुराधा ठवाळ यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. १६) श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात आले. विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे तांदळी, आढळगाव, भावडी, घुगलवडगाव, हिरडगाव आदी गावांतील शेतकऱ्यांचे गहू, हरभरा, फळबागांसह इतर पिके जळत असून पाणी उपलब्ध असूनही वीज नसल्याने पिकांना पाणी देता येत नसल्याची खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे शेती पंपांसाठी दिवसा आणि पूर्ण दाबाने वीज पुरवठा करण्यात यावा, आढळगावसह अन्य भागांत आवश्यक ठिकाणी नवीन रोहित (ट्रान्सफॉर्मर) बसविण्यात यावेत तसेच आढळगाव येथे महावितरणकडून सहाय्यक अभियंत्याची नियुक्ती करावी, अशा मागण्यांचे निवेदन संबंधित विभागाला देण्यात आले. आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी नायब तहसीलदार मिलिंद जाधव, वीज वितरणचे उपकार्यकारी अभियंता अतुल इंदुलकर व सहाय्यक अभियंता अजय भोगम उपस्थित होते. उपकार्यकारी अभियंता इंदुलकर यांनी समाधानकारक चर्चा करत तांदळी दुमाला येथे सुरू असलेला सौर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल, असे सांगितले. तसेच तांत्रिकदृष्ट्या सक्षम व निकषात बसणाऱ्या वाहिन्यांवर शेती पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा देण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. याशिवाय अजय भोगम यांची सहाय्यक अभियंता म्हणून नियुक्ती केल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले.

लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आपले आमरण उपोषण स्थगित केले.

या उपोषणात श्रीकांत ठवाळ, बबन काळे, प्रभाकर शिंदे, अंजन जाधव, गणेश शिंदे, संजय होले, रामदास काळाने, नंदू राऊत, पोपट छत्तीसे, चंद्रकांत काळे, खोडवे, नवनाथ बोळगे, पांडुरंग काळे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# 'सेवा फेस्ट २०२६' उत्साहात; नागरिकांची सहकुटुंब उपस्थिती

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष 'International Year of Volunteering' म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर सेवा सहयोग फाऊंडेशन आयोजित "सेवा फेस्ट – २०२६ : उत्सव सेवेचा" हा भव्य सामाजिक महोत्सव सिंहगड रोड येथील 'कलाग्राम' मध्ये उत्साहात पार पडला. सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या महोत्सवाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्वयंसेवक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, सीएसआर अधिकारी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुमारे सात हजारांहून अधिक नागरिकांनी कुटुंबासह भेट देत उपक्रमांचा अनुभव घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात विविध सेवा क्षेत्रात कार्यरत मान्यवरांच्या प्रेरणादायी मनोगतांनी झाली. यावेळी गरवारे टेक्निकल कॉलेजचे अध्यक्ष विवेक कुलकर्णी, के.जे. ग्रुप ऑफ इंजिनियरिंगचे विनोद जाधव, इन्फोसिसचे प्लांट डीसी हेड प्रवीण कुलकर्णी, सेवा सहयोग फाऊंडेशनचे संचालक किशोर मोघे आणि सेवा फेस्ट २०२६चे प्रकल्प समन्वयक विनीत कोंडेजकर उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात प्रवीण कुलकर्णी यांनी स्वयंसेवकांनी कुटुंबासह सेवा उपक्रमांत सहभागी व्हावे, यावर भर दिला. स्वयंसेवेचा संस्कार लहानपणापासून मुलांमध्ये रुजल्यास सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक बळकट होते, असे त्यांनी नमूद केले. "समुत्कर्ष" प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सृजनशील कार्यक्रमांनी उत्सवाची प्रेरणादायी सुरुवात झाली.

उत्सवादरम्यान "किशोरी विकास" माहिती पुस्तिका, "चेतना" प्रकल्पाचे पुस्तक तसेच "महिला सक्षमीकरण दशकपूर्ती" पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू आणि खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

सेवा सहयोगच्या विविध प्रकल्पांचे एकूण ३९ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या माध्यमातून सामाजिक उपक्रम, यशोगाथा, प्रशिक्षण आणि जनजागृती यांची माहिती देण्यात आली. "सीएसआर मीट", "एज्युकेशन मीट" आणि "सेवा कट्टा" या संवाद सत्रांतून सामाजिक क्षेत्रातील विविध विषयांवर चिंतन आणि मार्गदर्शन झाले. समस्यांवर उपाययोजना आणि भविष्यातील दिशा यावरही चर्चा करण्यात आली.

या महोत्सवाला खासदार मेधा कुलकर्णी, नगरसेवक कुणाल टिळक तसेच लेखक-दिग्दर्शक किरण यज्ञोपवित यांनी भेट देत सेवा सहयोगच्या सातत्यपूर्ण समाजकार्याचे कौतुक केले.

उत्सवादरम्यान उपस्थित स्वयंसेवक आणि नागरिकांनी समाजाच्या भल्यासाठी शाश्वत बदल घडविण्यासाठी सक्रिय सहभाग घेण्याची "सेवा प्रतिज्ञा" घेतली. स्वयंसेवकांचा ध्यास, समर्पण आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी या महोत्सवातून प्रकर्षाने जाणवली.

"सेवा फेस्ट २०२६" हा केवळ एक कार्यक्रम न राहता समाजातील माणसांना एकमेकांशी जोडणारी आणि स्वयंसेवेची प्रेरणा देणारी सशक्त चळवळ ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**संगमनेरखुर्द : (समर्थ गांवकरी)**

धांदरफळ खुर्द येथील बी जे खताळ जनता विद्यालय 2025 26 या वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संचालक दत्ता कोकणे विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश शिंदे, तसेच माजी मुख्याध्यापक अत्तर ,भालेराव, यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दत्ता कोकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करताना दहावीचे वर्ष आपल्या जीवनात अतिशय महत्त्वाचा आहे. दहावीच्या निकालावरती पुढील शिक्षणाची रणनीती ठरते त्याचप्रमाणे विद्यालयाचा निकाल परंपरेनुसार शंभर टक्के लागतो आणि तो निकाल याही वर्षी शंभर टक्के निकाल लागेल अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता दीपक खताळ व कु. फटांगरे सारिका मनोगत ठोंबरे साक्षी, श्रीकांत, म्हस्कुले, निशा गणेश या विद्यार्थिनी मनोगत व्यक्त केले.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयासाठी प्रत्येक वर्गात सिलिंग फॅन भेट म्हणून दिला.

या कार्यक्रमासाठी संदीप ठोंबरे उपसरपंच योगेश खताळ बांगर सर, घुले सर, कांबळे सर, श्रीमती अकोलकर, श्रीमती बाचकर, राहुल खताळ सर, वाळे मामा तसेच बोराडे मामा उपस्थित होते.ग्राम विकास सेवा संघाचे अध्यक्ष भास्कर खताळ (पाटील) यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाची प्रगती चालू आहे.


## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

१. यादव विश्वनाथ कोटकर, रा. कुंभेफळ, ता.अकोले, जि. अ.नगर..**अर्जदार**

**विरुध्द.....** १. चांगुनाबाई नाना कोटकर, २. मैनाबाई नाना कोटकर, ३. तुळसाबाई नाना कोटकर, सर्व रा. कुंभेफळ, ता. अकोले, जि. अ.नगर **...सामनेवाले**

या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, यादव विश्वनाथ कोटकर, रा.कुंभेफळ, ता.अकोले यांनी मौजे कुंभेफळ ता.अकोले येथील स.नं. २४/१, २४/४, ४६/१, ४६/२, ४६/३, ५३१, ५८/३८ या ७/१२ मधील इतर हक्कात दाखल असलेली नावे **(मैनाबाई नाना कोटकर, चांगुणाबाई नाना कोटकर, तुळसाबाई नाना कोटकर)** पोकळीस्त म्हणुन कमी होणेबाबत दिनांक ३०/१०/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जाबाबत दिनांक ०४/०३/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी पोकळीस्त म्हणुन इतर हक्कातील नावे असलेल्या व्यक्तींचे कोणी वारस असल्यास सदर वारसांनी अथवा कोणाचे काही म्हणणे असल्यास कागदपत्रासह सदर दिनांकास उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत कुणाचेही काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/०२/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**आरटीएस केस क्र. ०५/२०२६**
**अकोले,दि. १७/२/२०२६**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**



## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर.✆:०२४१-२३२६९१४

**जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /७११६/ सन २०२६** **दिनांक -१३/०२/२०२६**

**स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम**

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.


| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतु:सिमा | | | |
| | | | | | | | पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | कर्ज - विकास त्रिंबक पांढरे यांची मिळकत व करिता | जामखेड | १७७९३८२/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११४५/१ | २.३८.०० | २३.८० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - दत्तात्रय श्रीराम वारे यांची मिळकत | जामखेड<br>रत्नापुर<br>रत्नापुर<br>रत्नापुर<br>रत्नापुर | | ७४०पैकी<br>५१६<br>५१६पैकी<br>५१६पैकी<br>६६पैकी | ०.२७पैकी<br>०.१९.००<br>२.२६.००पैकी<br>२.२७.००पैका<br>४.३२.००पैकी | ०.३५<br>०.६६<br>५.७६<br>५.७८<br>२.२८ | | | | |
| | गहाणदार- नितीन त्रिंबक पांढरे यांची मिळकत | जामखेड | | ११४५/१ | २.३८.०० | २३.८० | | | | |
| | जामि- सोनाली विकास पांढरे | विश्रामगृहामागे ता.जामखेड | | | | | | | | |
| २ | कर्ज - अशोक निवृत्ती नेहरकर यांची मिळकत व करिता | तेलगंशी<br>तेलगंशी | १८६०५८/- +इतरखर्च+ होणार व्याज | ३६२<br>६१८ | १.२८<br>२.४६.०० | २.२३<br>३.२५ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - राजेंद्र भास्कर नागरगोजे यांची मिळकत | दिघोळ<br>खर्डा<br>ता.जामखेड | | ६९७<br>७०२ | ०.५१<br>०.०३.२२ | २.३८<br>०.०६ | | | | |
| ३. | कर्ज - सुरेश आदिनाथ भोरे यांची मिळकत | देवदैठण<br>देवदैठण<br>देवदैठण | ३६५०२९/- +इतरखर्च+ होणार व्याज | २९१/१पैकी<br>३४२पैकी<br>३४६पैकी | ०.०४पैकी<br>०.५२००पैकी<br>०.९६पैकी | ०.०४<br>१.३७<br>१.३१ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - अशोक निवृत्ती नेहरकर यांची मिळकत | तेलगंशी ता.जामखेड | | ३६२ | १.२८.०० | २.२३ | | | | |
| ४. | कर्ज - बाबासाहेब देवराम मिसाळ यांची मिळकत व करिता | मोहरी | ८०५८०/- +इतरखर्च+ होणार व्याज | २१४ | ०.२५ | ०.५३ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| | जामि - राजेंद्र भास्कर नागरगोजे यांची मिळकत | दिघोळ<br>खर्डा | | ६९७<br>७०२ | ०.५१<br>०.०३.२२ | २.३८<br>०.०६ | | | | |
| | जामि - सोपान आबा गोपाळघरे यांची मिळकत | नागोबाची वाडी ता.जामखेड | | ३२८ | ०.४५ | ०.७५ | | | | |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक -१३/०२/२०२६

सिल

सही
(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह.
फेडरेशन मर्या,अ.नगर



# नागपूर व रामटेक येथे नानजीभाई ठक्कर व डॉ. विश्वासराव आरोटे यांचे जंगी स्वागत!

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे एन.के.टी. फाउंडेशनचे अध्यक्ष तथा थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व 'दैनिक समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी दोन्ही मान्यवरांच्या समाजहिताच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच नागपूर जिल्ह्यातील रामटेक विधानसभा मतदारसंघ परिसरातही त्यांचे स्वागत करण्यात आले. स्थानिक नागरिकांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. समाजकार्य व पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या या दोन्ही मान्यवरांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



ठाणे : दिवा शहरातील दादूस नगर, जिव्हाळा हॉल येथील आदर्श विद्यालयात खाद्यमोहत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी खाद्य मोहात्सवात शालेय विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्य पदार्थ बनवून आणले होते तर कार्यक्रमाचे उदघाट्न नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांनी केले. प्रसंगी शाळेचे संचालक अमित मिश्रा, मुख्याद्यापक शशीधर चतुर्वेदी तसेच शिक्षक स्नेहा पाटील, सपना शुक्ला यांच्यासह इतर शिक्षकांनी मोहत्सवाचे योग्य पद्धतीने नियोजन केले होते. प्रसंगी अनेक पालकांनी देखील मोहत्सवाला आपली उपस्थिती दर्शवीली.

(फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### शिवसाई सामाजिक संस्थेतर्फे महाशिवरात्री उत्सव व समारंभ संपन्न!

पारनेर **(स. गांवकरी)** : पारनेर (जि. अहिल्यानगर), दि. १६ फेब्रुवारी २०२६ – शिवसाई सामाजिक संस्था यांच्या वतीने पो. वाफारे, कर्जुले, हरेश्वर (ता. पारनेर) येथे महाशिवरात्रीनिमित्त भव्य उत्सव व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामस्थ व विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान शिवाच्या पूजाअर्चा व आरतीने झाली. भक्तिमय वातावरणात भजन, कीर्तन व धून सादर करण्यात आले. याप्रसंगी समाजरत्न नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचा शाल, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. नारायण महाराज जाधव, ह.भ.प. संतभूषण बजरंग महाराज आंधळे, ह.भ.प. संतभूषण रामकृष्ण महाराज वाकुडे, ह.भ.प. ज्ञानयोगी भास्कर महाराज शिंदे यांच्यासह कर्जुळे व हरेश्वर येथील सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नानजीभाई ठक्कर यांच्या सेवाकार्याचे कौतुक करून ते समाजासाठी प्रेरणास्त्रोत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. धार्मिक भावना व सामाजिक ऐक्याचे सुंदर मिश्रण असलेला हा सोहळा उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

### शिवरायांचे २०२६ "जाणता राजा" भव्य चित्र प्रदर्शन

जुन्नर तालुका **(स. गांवकरी)** : श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ ओतूर संचलित सावित्रीबाई फुले विद्यालय व सीताबाई तांबे ज्युनिअर कॉलेज ओतूर कलाशिक्षक प्रदीप सूर्यवंशी यांनी कोरोना काळापासून ते आज तागायत शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित व्यक्तीचित्रे व प्रसंग चित्रे या विषयावर लहान मोठ्या आकारात विविध माध्यमात चित्रे साकारले असून जाणता राजा म्हणजे शिवाजी महाराजांच्या चित्रांचे प्रदर्शन मंगळवार दिनांक १७फेब्रुवारी ते गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयाच्या मैदानात सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत विनामूल्य पाहण्यास मिळणार आहे.तरी सर्व शिव भक्तांनी या संधीचा लाभ घ्यावा. प्रदीप सूर्यवंशी यांनी आत्तापर्यंत समाजातील आदर्श सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींचे व शिक्षकांचे वाढदिवसानिमित्त व्यक्तिचित्र रेखाटन करून त्यांचा आनंद द्विगुणित करत प्रसार माध्यमांद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत.रांगोळी कलेतूनही त्यांनी समाज प्रबोधन करण्याचे काम केलेले आहे.त्याचीच दखल घेऊन राज्यातील विविध संस्थांनी त्यांना पुरस्कार देऊन गौरविले आहे.

### ओतूरच्या,रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलचे, स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

जुन्नर तालुका **(स. गांवकरी)** : ओतूर येथील अग्रगण्य शैक्षणिक संस्था रॉयल एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर, ओतूर संचलित रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवार, दि:- १४ फेब्रुवारी रोजी अत्यंत दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला प्री-स्कूल ते इयत्ता चौथीपर्यंतच्या चिमुकल्यांनी सादर केलेल्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित पालकांची मने जिंकली आणि सभागृहात टाळ्यांचा कडकडाट घुमला.हा सोहळा केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी,त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्या साठी आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. लहान वयातच व्यासपीठा वर उभे राहून आपली कला सादर करणाऱ्या बालचमूंनी उपस्थितां ना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई,ठाणे,पुणे, पिंपरी- चिंचवड यांसारख्या महानगरपालिकांचे स्ट्रीट लाईट कॉन्ट्रॅक्ट घेणारे नामवंत दानशूर उद्योजक सन्माननीय शिवाजी पाटील डुंबरे उपस्थित होते.आपल्या मनोगतात त्यांनी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत,शैक्षणिक गुणवत्तावाढी साठी भविष्यात तन-मन-धनाने सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.पाहुण्यांचा परिचय अश्विनी शिंगोटे आणि स्वप्नाली औटी यांनी केला. शाळेचे हितचिंतक व मार्गदर्शक सन्माननीय ॲडव्होकेट जयराम तांबे यांनी संस्थेच्या संचालक मंडळाचे तसेच शिक्षकवर्गाच्या अथक परिश्रमांचे विशेष कौतुक केले. "ही शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर असून येथील संस्कार मूल्येच विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याची पायाभरणी करतात,"असे ते म्हणाले शाळेचे हितचिंतक आणि मार्गदर्शक श्री. बाळासाहेब तांबे यांचीही उपस्थिती आम्हाला लाभली. शैक्षणिक व औद्योगिक सल्लागार आणि साहित्यिक सन्माननीय अतिथी डॉ. राजेश्वर हेंद्रे,यांनी विद्यार्थ्यांना ध्येयवादी बनण्याचा आणि वाचनाची आवड जोपासण्याचा संदेश दिला.विविध प्रेरणादायी उदाहरणांतून त्यांनी वाचनसंस्कृतीचे महत्त्व पटवून देत उपस्थितांना प्रेरित केले.!! स्नेहसंमेलनात चिमुकल्यांनी सादर केलेल्या गाणी,नृत्ये यामधून त्यांची कल्पकता, आत्मविश्वास आणि सांघिक भावना प्रकर्षाने दिसून आली. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा सन्मान करण्यासाठी मान्यवरांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्रे,पदके,आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले याच प्रसंगी विद्यार्थ्यांच्या सर्जन शीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'हस्तलिखित' या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या अंकाचे संपादन शमा तांबोळी यांनी केले असून, त्यांनी आपल्या संपादकीय मनोगतातून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचे कौतुक केले.

## पुस्तकांचे वाचन करत कुसुमाग्रज वाचन अभियानाचा शुभारंभ

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



अनेकदा विविध उपक्रम, प्रकल्पांचा शुभारंभ फीत कापून, नारळ फोडून होत असतो. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या कुसुमाग्रज वाचन अभियानाचा शुभारंभ बालवाचनालयातील पुस्तकांचे विद्यार्थ्यांकडून वाचन करत अनोख्या पद्धतीने झाला.

तालुक्याच्या डोंगराळ व दुर्गम भागात वसलेल्या जिल्हा परिषदेच्या मांडेवाडी शाळेत आयोजित कार्यक्रमास गटविकास अधिकारी अमर माने, शिक्षण विस्तार अधिकारी संभाजी झावरे, केंद्रप्रमुख देवेंद्र आंबेटकर उपस्थित होते. यावेळी बोलताना अमर माने म्हणाले बालवयात मुलांना वाचनाची आवड लागली तर मुले अधिक समृद्ध होतील. अनेक मोठी व्यक्तिमत्व त्यांना पुस्तकात भेटतील. आयुष्यातील निश्चित ध्येय गाठण्यासाठी याचा चांगला उपयोग होईल, म्हणूनच कुसुमाग्रज वाचन अभियानाची प्रभावी अंमलबजावणी तालुक्यात करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

विस्तार अधिकारी संभाजी झावरे बोलताना म्हणाले वाचनाने माणूस समृद्ध होतो मनोरंजन व ज्ञानही मिळते. वाचन ही आनंद देणारी गोष्ट आहे. मुलांनी आवडणारी पुस्तके अधिक वाचावी व वाचनाचा छंद जोपासावा असे आवाहन यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कुसुमाग्रज वाचन अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या मांडेवाडी शाळेत छोटेखानी बाल वाचनालयाची निर्मिती केली आहे. मांडेवाडी शाळेत सुरू असलेल्या विविधांगी उपक्रमांबरोबरच 'बाला' उपक्रमाचे गटविकास अधिकाऱ्यांनी कौतुक केले. दुर्गम भागातील शाळेत मुलांचे वाचन लेखन पाहून त्यांनी आनंद व्यक्त करत मुलांना शुभेच्छा दिल्या.

शिक्षक भाऊसाहेब कासार अक्षरभारती वाचनालयाच्या माध्यमातून वाचनाचा प्रचार आणि प्रसार ग्रामीण भागात करत आहे. त्यांच्या 'फिरते वाचनालय' या उपक्रमाचे कौतुक केले. ज्या शाळांकडे वाचनालयाची पुस्तके कमी उपलब्ध असतील त्यांनी अशा फिरत्या वाचनालयातील पुस्तकांचा आधार घेत विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी प्रेरित करावे असे आवाहन यावेळी गटविकास अधिकारी यांनी केले. मांडेवाडी शाळेत झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक ज्ञानदेव फापाळे यांनी केले. अनुष्का रंधे हिने आभार मानले.

## सायकल बँक उपक्रम – ChildFund India मार्फत सहाय्य

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे ता:-जुन्नर यांच्या आवाहनानुसार जुन्नर परिसरातील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा सुलभ व्हावी या उद्देशाने "सायकल बँक" उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने २१ विद्यार्थ्यांना सायकली उपलब्ध करून देण्यात आल्या.यामध्ये राजूर नं. १ येथे १५ सायकलींचे वाटप अशोक लांडे यांच्या हस्ते करण्यात आले,तसेच मढ येथे ६ सायकली देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब तुकाराम मुंढे,सहशिक्षक गणेश अनंत रासकर,संतोष वैजापूर, मेघा भाऊ बंदे,अलका बगाड, गावचे युवा नेतृत्व संदीप मुंढे तसेच गावातील प्रतिष्ठित व्यक्ती,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

आपणास माहित आहे की चाईल्ड फंड इंडिया ही संस्था जुन्नर परिसरातील आदिवासी व दुर्गम भागांमध्ये विशेषतः लहान मुले व महिलांसाठी आरोग्य, शिक्षण,उपजीविका,बाल संरक्षण तसेच हवामान बदल या विषयांवर कार्यरत आहे. संस्थेचे फील्ड स्टाफ नियमितपणे गावांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेत असतात. त्या अनुषंगाने प्रकल्पातील काही विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी मोठ्या अंतराचा सामना करावा लागत असल्याचे आढळून आले यामुळे त्यांच्या उपस्थितीवर व शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत होता.ही गरज लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना मदत व्हावी, त्यांची शाळेत उपस्थिती वाढावी व शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे.

## शाळेत बालआनंद मेळावा अंतर्गत सांस्कृतिक महोत्सव २०२६ संपन्न



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिल्हेवाडी येथे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासा बरोबरच विद्यार्थ्यांमधील कला गुणांना व्यासपीठ मिळावं या हेतूने शाळेमध्ये सांस्कृतिक महोत्सव संपन्न करण्यात येत असतो.याही वर्षी सदर कार्यक्रम शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनुसया भोईर , उपस्थित मान्यवर उपसरपंच नितीन भोईर,माजी सरपंच तथा सदस्य दामोदर बूळे,पेसा मोबिलायझर सुनीता भोईर, माजी सरपंच योगिता ठोंगीरे,अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती विनोद भोईर उपाध्यक्ष रावसाहेब भोईर,ह.भ.प. नामदेव महाराज वायळ,संजय ठोंगीरे,पालक, ग्रामस्थ बचत गट सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी संस्कृतीचा वसा आणि वारसा पुढील पिढीसाठी ही सदोदित राहावा यासाठी आदिवासी लोकनृत्य घेण्यात आली होती. चिऊताई माझ्या अंगणात ये पासून तर आनंद दायी स्वर्गात आकाशगंगा या गीतापर्यंतची एक से बढकर एक अशी २० गाणी घेण्यात आली. विद्यार्थ्यांना उपस्थित माजी विद्यार्थ्यांच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले.तसेच विद्यार्थ्यां च्या गीतासाठी प्रोत्साहन म्हणून उपस्थित मान्यवरांनी बक्षीस देऊन कौतुक केले. दर्या माता साऊंड सर्व्हिस दीपक बुळे यांनी कार्यक्रमासाठी विनामूल्य साऊंड सिस्टिमचे सौजन्य केले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक प्रभाकर दिघे उपशिक्षक जनार्दन केदारी, अंगणवाडी कार्यकर्ती मीरा गवांदे, मदतनीस जयश्री भोईर यांनी केले.

## गुणवान होण्यासाठी एक एक क्षणाचा सदुपयोग करा

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



मेहनत करा,स्वप्न पहा,ते सत्यात उतरवा.वेळ माणसाला यशस्वी बनवत नाही तर वेळेचा योग्य वापर माणसाला यशस्वी बनवत असतो.गुणवान होण्यासाठी एक एक क्षणाचा सदुपयोग करा असे प्रतिपादन अकोले पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी केले. अकोले तालुक्यातील नूतन माध्यमिक विद्यालय पांजरे येथे इ.१० वीतील विद्यार्थी सदिच्छा समारंभ व वार्षिक पारितोषीक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.यावेळी गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत विचारमंच्यावरून बोलत होते. या प्रसंगी आदर्श महिला विकास संस्थेचे गणेश जाधव हे अध्यक्ष होते.

पुढे बोलताना अरविंद कुमावत यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात घोकमपट्टीला महत्त्व न देता कृतीयुक्त जीवन जगण्याचा संदेश दिला.व दहावी बोर्ड परीक्षा मध्ये जास्तीत जास्त मार्क कसे मिळतील याचे प्रात्यक्षिक सांगीतले.

अध्यक्ष गणेश जाधव यांनी आपल्या स्वच्छ आणि परखड प्रगल्भवाणीतून विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्याचा सफल मार्ग सांगितला.विद्यार्थ्यांनी सर्वच विषयांचे पेपर कसे सोडवावेत व कोणत्या प्रश्नाला सर्वाधिक प्राधान्य द्यावे. याचे सखोल विवेचन देऊन विद्यालय व विद्यालयाच्या बोलक्या भिंती, विद्यालयाला भौतिक सुविधा मिळवून देण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय उकिर्डे यांनी घेतलेली मेहनत, विज्ञान प्रयोगशाळा, सुसज्ज किचन शेड ,विद्यालयाच्या सभोवताली असलेल्या वृक्षांची मांदियाळी तसेच विद्यालय आदिवासी,अति दुर्गम व डोंगराळ भागात असून सुद्धा विद्यालय सर्व क्षेत्रात वेगाने पुढे जात असल्याचे सांगून विद्यालयाच्या मुख्याध्यापकांचे तोंड भरून कौतुक केले.

विस्तारअधिकारी संभाजी झावरे यांनी आजच्या स्पर्धेच्या

**गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत**

युगात तुमच्या शेजारी असलेल्या कळसुबाई शिखराएवढा उत्तुंग आत्मविश्वास आपल्याजवळ ठेवा व जीवन यशस्वी करण्याचा मूलमंत्र दिला.

प्रा. पुंजा भालेराव यांनी आयुष्याच्या पाऊलवाटा जिद्द व चिकाटी तसेच अभ्यासाच्या जोरावर यशस्वी होतात असे सांगून विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या.प्रथमतः किचन शेडचे उद्घाटन संपन्न झाले. यानंतर विद्यालयाने कला ,क्रीडा त्याचप्रमाणे वकृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा ,सुवाच्च अक्षर लेखन स्पर्धा त्याचप्रमाणे वृक्ष माझा सोबती या विषयावर सादर केलेल्या नाटिका व या सर्व स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. क्रिडा शिक्षक विष्णू मंडल.पाडोशी विद्यालयाचे मुख्या.आदिनाथ जाधव,सोमनाथ रहाणे, घाणे सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून विद्यालय प्रती कृतज्ञता व्यक्ती केली.कार्यक्रमाचे स्वागत मुख्याध्यापक संजय उकिर्डे यांनी तर प्रास्तावीक अर्जून शेळके यांनी केले. सूत्रसंचालन दिनकर खानेकर यांनी केले. तर अर्चना जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय राजूर येथे विविध गुणदर्शन व पारितोषीक वितरण समारंभाचे आयोजन

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे ॲड.मनोहरराव नानासाहेब देशमुख कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सोमवार दिनांक २३/०२/२०२६ ते २८/०२/२०२६ या कालावधीत विविध गुणदर्शन,वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषीक वितरण समारंभ सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड.मनोहरराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे.

सोमवार दि.२३/०२/२०२६ रोजी सकाळी ८.३०वा.पारंपारिक वेषभुषा मिसमॅच डे व बॉलीवूड डे,मंगळवार दि.२४/०२/२०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वा. पाककला,रांगोळी व पोस्टर स्पर्धा, बुधवार दि.२५/०२/२०२६ रोजी सकाळी ८ ते१०.३०वा.साडी डे व टाय डे, गुरूवार दि.२६/०२/२०२६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वा.विविध गुणर्शन, शुक्रवार दि.२७/०२/२०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी २वा. आनंदमेळा तसेच शनिवार दि. २८/०२/२०२६ रोजी सकाळी ८.३०ते. ९.३०वा. शेला पागोटे व प्रश्नमंजूषा तसेच सकाळी १० ते दुपारी १२.३०वा. पारितोषिक वितरण समारंभ आदी कार्यक्रमांचे महाविद्यालयामध्ये आयोजन केले आहे.

पारितोषीक वितरण समारंभ या दिवशी साहित्यिक व विनोदी कथाकार प्रमुख अतिथी डॉ.संजय कळमकर यांचे व्याख्यानाचे आयोजन केले आहे. या प्रसंगी तालुक्याचे कार्यसम्राट आमदार डॉ. किरणजी लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड,सचिव एम.एल.मुठे, कोषाध्यक्ष विवेकजी मदन,माजी प्राचार्य तथा माजी सचिव टी.एन.कानवडे,संचालक डॉ.रमेश भारमल, मिलिंदशेठ उमराणी, प्रकाशशेठ शहा, प्रकाश टाकळकर, श्रीनिवास येलमामे,विजय पवार, श्रीरामशेठ पन्हाळे,अशोक मिस्त्री, नंदकिशोर बेल्हेकर,मनोहरराव वाकचौरे,चिमणराव देशमुख, माधवी मुळे, रामजी काठे, डॉ. निता भारमल आदी प्रमुख मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

वरील सर्व उत्कृष्ट तसेच शानदार कार्यक्रमांचे आयोजन केले असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भाऊसाहेब देशमुख, विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी प्रा.डॉ.व्ही.एन. गिते, कला मंडळाचे अध्यक्ष प्रा.बी.के. थोरात, कार्याध्यक्ष प्रा.डॉ.आर. डी.ननावरे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.टी. शेणकर, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख प्रा.आर.सी. मुठे, प्रा. डॉ.आर.ए.कढणे, प्रा. मिनाक्षी आढारी, विद्यापीठ प्रतिनिधी राहूल मदगे, आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच तानाजी नरके, विदयार्थी प्रतिनिधी रोनक बोटे, अलका बुळे,अश्विनी इरनक, सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ व सत्यनिकेतन परिवार आदींनी उपस्थित राहून सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे अवाहन करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# पीएम जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गणोरे या ठिकाणी कवी कुसुमाग्रज वाचन प्रेरणा अभियान मोठ्या उत्साहात संपन्न

गणोरे : (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने कुसुमाग्रज वाचन अभियान गणोरे पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गणोरे या ठिकाणी हे अभियान सुरू झाले.

कुसुमाग्रज वाचन प्रेरणा दिनानिमित्त पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गणोरे ते संपूर्ण गणोरे गावामध्ये आकर्षक अशी ग्रंथदिंडी व फेरी यावेळी काढण्यात आली. ग्रंथदिंडीनंतर पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गणोरे या ठिकाणी गावातील प्रमुख मान्यवर, पालक तसेच विद्यार्थी, शिक्षक यांच्या हस्ते बाल ग्रंथालयाचे उद्घाटन मोठ्या थाटात करण्यात आले. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री



अनंत भंडारी यांच्या संकल्पनेतून व अहिल्यानगर जिल्हा परिषद चे शिक्षण अधिकारी श्री भास्कर पाटील यांचे मार्गदर्शनातून कवी कुसुमाग्रज वाचन प्रेरणा अभियान पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गणोरे तालुका अकोले या ठिकाणी सुरू करण्यात आले.

बालवयातच विद्यार्थ्यांच्या अंगी वाचन संस्कृती व वाचन चळवळ कायम राहावी सोबतच लहान मुलांचा मोबाईल व स्क्रीन टाईम कमी व्हावा. या हेतूने पीएमसी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा या ठिकाणी सुरू झालेले हे बालग्रंथालय व शिक्षकांच्या माध्यमातून लहान मुलांमध्ये विचार संपन्न अशी एक नवीन पिढी घडेल आणि या देशाचे सुजाण नागरिक बनतील असा आशावाद आपल्या मनोगतातून प्राचार्य सुशांत आरोटे यांनी बोलताना व्यक्त केला.

यावेळी आपल्या मनोगतातून श्री भाऊसाहेब आंबरे म्हणाले की, आपली शाळा,आपले विद्यार्थी, आपले गाव, याकरिता आपणा सर्वांना मिळून सामूहिक प्रयत्न करून, आपली भविष्यातील पिढी घडवायची असल्याने सर्वांनी एकत्र येत गावची शाळा, आणि गावचे विद्यार्थी,तसेच आपले गाव घडवून नवा आदर्श आपण समाजासमोर ठेवूया.,असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

बाल ग्रंथालयाच्या आणि पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गणोरे कवी कुसुमाग्रज वाचन प्रेरणा दिन या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री अशोक गंगाधर आहेर, सुनील आहेर, अमृतसागर दूध संघाचे संचालक श्री रामदास आंब्रे ,राजेंद्र आंबरे,दत्तात्रय आंबरे ,भाऊसाहेब चव्हाण संजय वाघचौरे ,विकास खातोडे, विश्वस्त निलेश आंबरे, विश्वस्त किरण आहेर, तज्ञ संचालक प्रवीण मालुंजकर, सौ.छाया आहेर, पोपट आहेर,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ आंब्रे, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष दत्तात्रय आहेर,पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेचे मुख्याध्यापक नेहरकर सर तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, व पालक आणि विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कुमार नवले यांनी तर या कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापक नेहरकर यांनी मानले.

# गुन्हा नोंदवून सखोल चौकशी करण्याची 'वैदू समाज विकास फाउंडेशन'ची मागणी

संगमनेर : (समर्थ गांवकरी)

संगमनेर शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत १२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सूरज सूर्यभान शिंदे यांची अज्ञात इसमांकडून मारहाण करून हत्या करण्यात आली होती. या धक्कादायक घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपींना कठोर शासन करावे, अशी मागणी 'अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशन'च्या वतीने पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

सविस्तर माहिती अशी कि , दि. १२/०२/२०२६ रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास सूरज शिंदे यांच्यावर अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला होता, ज्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. कै.सूरज सुर्यभान शिंदे हे आपल्या कुटुंबातील एकमेव कमावते व्यक्ती होते. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार असून, त्यांच्या निधनामुळे कुटुंबावर आर्थिक आणि मानसिक संकट कोसळले आहे.

वैदू समाजाच्या प्रमुख मागणी:

अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशनचे मार्गदर्शक दशरथ आटकर अध्यक्ष श्री.राजु रामा लोखंडे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ स्वामी शिरकुल वैदु यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांना निवेदन देण्यात आले. निवेदनात खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत:

कलम ३०२ अन्वये गुन्हा: सदर घटनेची गांभीर्याने दखल घेऊन भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ (हत्या) नुसार सखोल चौकशी करण्यात यावी.

या प्रकरणात प्रवीण शिंदे नावाचे साक्षीदार असल्याचे समोर येत असून, सत्याचा उलगडा करण्यासाठी त्यांची नार्कोटेस्ट करण्यात यावी.

मयत सूरज शिंदे यांचे कुटुंब अत्यंत गरीब असून त्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा.

अखिल महाराष्ट्र वैदू समाज संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहेजर या प्रकरणाचा तपास योग्य मार्गाने झाला नाही आणि कुटुंबाला न्याय मिळाला नाही, तर 'अखिल महाराष्ट्र वैदू समाजा'च्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर शासनाच्या परवानगीने राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

या निवेदनावर मारुती दुर्गा गायकवाड, मारुती मल्लू गायकवाड, जगन्नाथ मच्छिंद्र शिंदे, मारुती वसंत शिंदे, रामा तात्या शिंदे आणि अनिल बबन गायकवाड यांच्यासह इतर सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आरोग्य सेवेसाठी आशा वर्कर्सचे योगदान अमूल्य - महापौर




ठाणे : (समर्थ गांवकरी)

तळागाळात जाऊन वर्षानुवर्षे लोकसेवा आणि रुग्णसेवा बजावणाऱ्या आशा वर्कर्स या आरोग्यव्यवस्थेचा कणा आहेत, त्यांचे योगदान हे अमूल्य असल्याचे वक्तव्य महापौर शर्मिला पिंपळोलकर येथे केले. आज ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे विशेष सन्मान करण्यात आला. संशयित क्षयरुग्णांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करताना अपेक्षेपेक्षा अधिक कामगिरी करणाऱ्या प्रतिनिधीक स्वरुपात 20 आशा वर्कर्सना महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि उपमहापौर कृष्णा पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले. ठाणे महानगरपालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. स्वप्नाली कदम यांसह आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते. घराघरांत जाऊन नागरिकांशी संवाद साधत, आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहन देत आणि आजारांबाबत जनजागृती करत आशा वर्कर्स आरोग्य यंत्रणेचा भक्कम आधारस्तंभ ठरत आहेत. संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांची नोंदणी करणे ही अत्यंत जबाबदारीची भूमिका त्यांनी प्रभावीपणे पार पाडली आहे. अनेक आशा वर्कर्सनी निर्धारित उद्दिष्टांपेक्षा जास्त रुग्णांची नोंदणी करून आपली कर्तव्यनिष्ठा सिद्ध केली असल्याचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. तर उपमहापौर कृष्णा पाटील यांनी देखील आशा वर्कर्सच्या कामाचे कौतुक करीत ठाणे महापालिका त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. तर मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी आशा वर्कर्सच्या कामाचे कौतुक केले.

संशयित क्षयरुग्णाच्या नोंदणी कामात आशांनी सक्रिय सहभागी घेतला. तसेच 10 दिवसांत 150 जणांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट दिले असताना हजारहून अधिक संशयित रुग्णांची नोंदणी त्यांनी केली, त्यामुळेच त्यांचा सन्मान करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

# राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन

नायगाव : (समर्थ गांवकरी)

मुकनायक वाचनालय मांजरम आणि सप्तरंगी साहित्य मंडळ, नांदेड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता कै .माधवराव शिंदे गुरुजी साहित्य नगरी, मांजरम येथे करण्यात आले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून साहित्य, विचार आणि संस्कृतीची समृद्ध मेजवानी साहित्यप्रेमींना अनुभवता येणार आहे. संमेलनाचे उद्घाटन उद्योजक बालाजी बचेवार यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. रामकृष्ण बदने राहणार आहेत.

# “झोपडीचा बंगला करायचा असेल तर शिक्षण हाच मार्ग” – ज्येष्ठ विचारवंत संजय गोर्डे

गणोरे : (समर्थ गांवकरी)

“आपल्या झोपडीचा बंगला करावयाचा असेल तर शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.

जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर अभ्यास आणि अभ्यासच करा,” असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत संजय गोर्डे यांनी केले.

गणोरे येथील रयत शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी विद्यालय गणोरे येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या शुभचिंतन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी विवेकानंद पतसंस्था चे अध्यक्ष लालुशेठ दळवी होते.

गोर्डे पुढे म्हणाले की, पहिली ते नववीपर्यंत विद्यार्थ्यांनी वर्षाला चार या प्रमाणे ३६ परीक्षा दिलेल्या




आहेत. त्यामुळे दहावीची परीक्षा न घाबरता आत्मविश्वासाने द्यावी.

“एकच मिशन – अभ्यास, अभ्यास आणि अभ्यास,” असे त्यांनी ठामपणे सांगितले. मोबाईल, मित्र, क्रिकेट, टीव्ही आणि इतर आकर्षणांपासून दूर राहून ‘अव्याक’ (अभ्यास, व्यायाम आणि कला) हा मंत्र आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उत्तर विभागाचे निमंत्रित सदस्य अंबादास दातीर, पोलीस निरीक्षक विकास काळे, मुख्याध्यापक अण्णासाहेब दिवे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अशोक आहेर, सरपंच संतोष आंबरे, भाऊसाहेब आंबरे, सेवानिवृत्त शिक्षक सुहास जाधव, संजय वाकचौरे, योगेश आंबरे, राजेंद्र आंबरे, सचिन रेवगडे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थिनी राजेश्वरी खतोडे व संघमित्रा आहेर यांनी मनोगत व्यक्त केले.

लालुशेठ दळवी यांनी विद्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी ११,१०१ रुपयांची देणगी जाहीर केली. सूत्रसंचालन आयर्न आंबरे व वैष्णवी पोपेरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर. डी. भांगरे यांनी मानले.

# समर्थच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत यश

बेल्हे : (समर्थ गांवकरी)

अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन बँगलोर व सॅमसंग सेमीकंडक्टर इंडिया रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या "अन्वेषण" या राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत समर्थच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केल्याची माहिती समर्थ अभियांत्रिकी चे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे व गुरुकुल चे प्राचार्य सतिश कुन्हे यांनी दिली.

ही स्पर्धा सॅमसंग सेमिकन्डक्टर इंडिया रिसर्च यांनी पुरस्कृत केली होती.अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन यांच्या सहयोगाने राज्यातील विद्यार्थ्यांसाठी नुकतीच विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्पर्धा बँगलोर येथे आयोजित करण्यात आली होती. शाळा आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील असलेल्या नवउपक्रमशीलतेला,नवनवीन




कल्पनांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने या विज्ञान आणि तंत्रज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजिनिअरिंग अंतिम वर्षात शिकत असलेले प्रीतम बर्वे,श्रुती वाकचौरे व समर्थ गुरुकुल मधील अवधूत भांबेरे, श्रद्धा आग्रे या ग्रुप ने सादर केलेल्या "व्हर्साटाईल सर्विस बोट" या प्रकल्पास द्वितीय क्रमांक मिळाला. रुपये ४० हजार रोख,सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

स्मार्ट सर्व्हिस रोबोट हा शाळा, कॉलेज,ऑफिस, हॉस्पिटल आणि उद्योगांमध्ये अशा विविध क्षेत्रांमध्ये सर्व्हिस देण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.रोबोट हा सेन्सर्स आणि मायक्रोकॉन्ट्रलरच्या मदतीने स्वयंचलितपणे कार्य करतो. लोकांना मदत करणारा स्मार्ट रोबोट प्रश्नांची उत्तरे देणारा AI प्रणाली,मानवी चेहरा ओळखणारी प्रणाली विकसित करणे यासाठी या प्रकल्पाचा वापर करण्यात आल्याचे विभागप्रमुख प्रा.निर्मल कोठारी यांनी सांगितले. हा प्रकल्प तयार करण्यासाठी समर्थ अभियांत्रिकीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख प्रा.निर्मल कोठारी,प्रा.प्रियांका लोखंडे,प्रा. सुचिता साबळे,प्रा.कौस्तुभ मेहेर,गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुन्हे, एच पी नरसुडे,संजीवनी गायकवाड,वैशाली सरोदे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदिप गाडेकर तसेच संकुलातील सर्व विभागाचे प्राचार्य,विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# विविध विकास कामांचा शुभारंभ

कंधार : (समर्थ गांवकरी)

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील श्रीक्षेत्र महादेव मंदिर देवस्थानच्या सर्वांगीण विकासकामासाठी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ प्रताप पाटील चिखलीकर यांनी ४९.५५ लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरच्या निधीमधून करण्यात येत असलेल्या विविध विकासकामांचे भूमीपूजन दि.१५ फेब्रुवारी रोज रविवारी महाशिवरात्रीचे औचित्य साधून आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. आ चिखलीकर यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधी मध्ये सांस्कृतिक सभागृह, संरक्षण भिंतीचे बांधकाम आणि परिसर सुधारणा कामांचा समावेश आहे.कार्यक्रमाच्या प्रारंभी आ. चिखलीकर यांनी महादेवाचे दर्शन घेतले.

# ठाण्यात पहाटे इमारतीचा ५व्या मजल्यावरील स्लॅब ४ थ्या मजल्यावर कोसळून ३ जण गंभीर जखमी

ठाणे : (समर्थ गांवकरी)

आज पहाटे ०३:०७ वाजताच्या सुमारास आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये प्राप्त झालेल्या घटनेच्या माहितीनुसार नूतन नीलम अपार्टमेंट, हनुमान मंदिर जवळ, शांतीनगर, वागळे इस्टेट, ठाणे (प.) याठिकाणी नूतन नीलम अपार्टमेंट, ए विंग (इमारत तळ +५ मजली, ३० ते ३५ वर्षे जुने बांधकाम) या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील रूम नं. ५०१ (मालक - श्री. गजेंद्र प्रसाद) चा स्लॅब चौथ्या मजल्यावरील रूम नंबर-४०२(मालक श्री. यादव) वरती कोसळला आहे. सदर घटनास्थळी मा. उपायुक्त श्री. गोदेपुरे सो. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री. तडवी सो., बांधकाम विभागाचे अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी व पोलीस अधिकारी व कर्मचारी, तसेच अग्निशमन दलाचे जवान



०१- फायर वाहनासह, ०१- रेस्क्यू वाहनासह, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१-पीकअप वाहनासह, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता, अग्निशमन दलाचे जवान ०१- इमर्जन्सी टेंडर व ०१ - रेस्क्यु वाहनासह, महावितरण कर्मचारी उपस्थित होते. सदर घटनेत १) गजेंद्र प्रसाद, ( पु/ वय - ६० वर्षे ) २) प्रिन्स यादव, (पु/ वय :- २५ वर्षे) ३) श्री प्रदीप यादव. (पु/ वय:- २३ वर्षे) जखमी तिन्ही व्यक्तींना उपचाराकरिता ठा.म. पा. रुग्णवाहिकेमधून मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे रुग्णालयामध्ये उपचाराकरिता दाखल करण्यात आले असून त्यांच्यावरती उपचार सुरू असून श्री. प्रदीप यादव यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचाराकरिता फोर्टिस हॉस्पिटल, भांडुप, मुंबई येथे दाखल करण्यात आले आहे. सदरची इमारत C2B या प्रवर्गामध्ये येत असून, इमारत धोकादायक असल्याने सुरक्षेतेच्या कारणास्तव सदर इमारत पूर्णतः रिकामी करण्यात आली आहे. इमारतीमध्ये एकूण २६ रूम असून त्यामध्ये एकूण अंदाजे ८५ ते ९५ व्यक्ती राहत होते. इमारतीमधील रहिवाशांना तात्पुरत्या स्वरूपामध्ये ठा.म.पा. शाळा क्रमांक - ३८, शांतीनगर, वागळे इस्टेट येथे वास्तव्य करिता पाठविण्यात आले आहे.

# राजेश्वर गोरे यांनी स्वतः भाग घेऊन दिला फिट इंडियाचा संदेश

कंधार : (समर्थ गांवकरी)

कंधारचे तहसीलदार राजेश्वर गोरे यांनी लातूर मॅरेथॉनच्या माध्यमातून स्वतः १० कि मी मॅरेथॉन पूर्ण करून लोकांना फिट इंडियाचा संदेश दिला. सध्या धावपळीच्या काळामध्ये माणूस कामामध्ये व्यस्त झाला असून लाखो लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेक व्यक्तीला अनेक शारीरिक व्याधी शुगर, बिपी, हृदयविकारने ग्रासले आहे . चांगले निरोगी जिवन जगायचे तर मग चला रोज सकाळी पळुया योग साधना करुया व आपले आरोग्य उत्तम ठेवूया फिट इंडिया निरोगी इंडिया हा संदेश देऊया, अशाच लातूर येथे आय एम ए मॅरेथॉन 2026 मध्ये कंधार तालुक्याचे तहसीलदार तथा दंडाधिकारी राजेश्वर गोरे सरांनी अगोदर आपण स्वतः दररोज नियमितपणे रनिंग



करून आज मॅरेथॉन मध्ये सहभागी होऊन समाजाला एक चांगला आरोग्याचा फिट इंडिया राहण्याचा संदेश या माध्यमातून दिला असून तालुक्यातील व सर्वच लोकांनी या गोष्टीचा स्वीकार करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक व्यक्तीने नियमितपणे रनिंग करण्याची गरज आहे. यामुळे आपले शरीर निरोगी बनते व जीवनाचे अनेक धोके ठरतात व आपण सुखी कुटुंब सुखी आपले आरोग्य सुखी ठेवता येते असे.

# सुरेल बंदिशी, मनमोहक चित्रांतून रंगले 'रामगान'

## अविष्कार क्रिएशन्सतर्फे आयोजन; शब्द-चित्रांच्या संयोगातून रामायणाची अनुभूती

पुणे : (समर्थ गांवकरी)

विविध रागांमध्ये गुंफलेल्या बंदिशी, कलाकारांचे कर्णमधुर सादरीकरण, सुरेल बंदिशींना प्रासंगिक चित्रांची जोड यातून भारतीय शास्त्रीय संगीत, चित्रकला आणि रामायणातील अध्यात्मिक भावविश्व यांचा अनोखा संगम पुणेकरांनी अनुभवला. बंदिशकार, गायिका व चित्रकार भाग्यश्री गोडबोले यांनी रामायणातील प्रसंगांवर रचलेल्या शास्त्रीय बंदिशी व त्यांनीच साकारलेल्या चित्रांचे प्रदर्शन अशा दृकश्राव्य स्वरूपातून रसिकांनी 'रामगाना'ची रसानुभूती घेतली.



आविष्कार क्रिएशन्सतर्फे आयोजित 'रामगान' या सांगितीक मैफिलीचे नुकतेच आयोजन केले होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात रसिकांनी रामायणातील विविध प्रसंगांवर आधारित 'रामगाना'ची रसानुभूती घेतली. राम जन्मापासून ते रावणवध करून प्रभू श्रीराम अयोध्येला परतल्यानंतर त्यांचा राज्याभिषेक होईपर्यंत, वनवासावेळी माता शबरीची भेट, अहिल्या उद्धार, सीताहरण, सीतेला शोधतानाचा विरह, राम हनुमान भेट, विजयी पताका व जयघोष असे अनेक शब्दबद्ध व चित्रबद्ध केलेले प्रसंग पाहून रसिक भारावून गेले.

पं. अमोल निसळ, सावनी दातार, डॉ. सानिका गोरेगावकर, श्वेता अभिषेक, स्वानंदी सडोलीकर आणि स्वतः भाग्यश्री गोडबोले यांनी बंदिशींचे सादरीकरण केले. भटियार, केदार, मालकंस, हिंडोल, ललत, भूपेश्वरी, जौनपुरी, जनसंमोहिनी, जयजयवंती, मारवा, बिलासखानी तोडी, शुद्ध सारंग, मधुकंस, झिंझोटी, सोहोनी आणि भैरवी अशा सोळा रागांतील रचनांनी कार्यक्रमात वैविध्यपूर्ण रसोत्पत्ती निर्माण केली. खुमासदार शैलीतील सुंदर निरूपण डॉ. सुनील देवधर यांनी केले. अमित जोशी यांचे संगीत संयोजन, तर अमित जोशी, मनोज भांडवलकर, दिप्ती कुलकर्णी, प्रज्ञा देसाई आणि वसंत देव यांनी वाद्यांवर साथसंगत केली. प्रास्ताविक धनश्री करंबेळकर यांनी केले.

'रघुनंदन रूप मनोहर' या भटियार, ललत रागातील बंदिशीने मैफलीची सुरुवात झाली. केदार रागातील 'प्रकट होत खुद' ही बंदिश श्वेता अभिषेक यांनी, तर मालकंस रागातील 'कड कड कड नाद' ही बंदिश अमोल निसळ यांनी जोशपूर्ण सादर केली. वनवासाचे वर्णन करणाऱ्या हिंडोल रागातील 'राम का हो निर्वासन' व जयजयवंती रागातील 'सीताहरण की बात' बंदिशी स्वानंदी सडोलीकर यांनी सादर केल्या.'गमन करत रामलखन' या ललत रागातील भावस्पर्शी बंदिशीतून सावनी दातार यांनी वनवासाचा प्रसंग उभा केला. सानिका गोरेगावकर यांनी 'जनसंमोहिनी' या शांतरसाच्या रागात 'रामचरण स्पर्श होत', तर भूपेश्वरी रागात अमोल निसळ यांनी 'शूर्पणखा अति क्रोधित' बंदिशींतून शूर्पणखेचा संताप व्यक्त केला. सानिका गोरेगावकर यांनी 'शबरी असीम रामभक्त' ही मिश्र झिंझोटीतील बंदिश सादर केली.

# टिएटोच्या सहकार्याने २५० ग्रामीण महिला उद्योजकांच्या डिजिटल आणि उत्पन्न क्षमतांना बळकटी दिली

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

प्रशिक्षणाद्वारे, महिला उद्योजकांनी डिजिटल साधनांचा मजबूत अवलंब आणि अधिक आर्थिक स्वातंत्र्य दर्शविले. ९० टक्क्यांहून अधिक लोक आता सक्रियपणे डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म वापरतात, ८६ टक्क्यांहून अधिक लोक त्यांचे व्यवसाय व्यवहार स्वतंत्रपणे व्यवस्थापित करतात. जवळजवळ सर्व सहभागींना स्मार्टफोन आणि इंटरनेटची उपलब्धता आहे, ज्यामुळे ग्राहकांशी आणि डिजिटल प्लॅटफॉर्मशी थेट संबंध निर्माण होतात. व्यवसायाच्या प्रमोशनसाठी सोशल मीडिया वापरण्यावरील आत्मविश्वास देखील वाढला आहे, व्हॉट्सअ‍ॅप बिझनेससारखे प्लॅटफॉर्म ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि विक्रीसाठी प्रभावी माध्यम म्हणून उदयास येत आहेत.

डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्रामीण महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी एक मजबूत पाया रचत, नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोच्या सहकार्याने २५० ग्रामीण महिला उद्योजकांना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले, ज्यामुळे त्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेत अधिक सक्रियपणे सहभागी होता आले. या कार्यक्रमाचा उद्देश व्यावसायिक क्षमता मजबूत करणे आणि महिलांना भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्रियपणे सहभागी होण्यास सक्षम करणे हा होता. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, चाकण, हवेली, जुन्नर, खेड आणि मंचर ब्लॉकमध्ये राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने हस्तकला, हातमाग, उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील महिला उद्योजकांना पाठिंबा दिला, डिजिटल प्रवेशाचे मोजमाप करण्यायोग्य व्यावसायिक परिणामांमध्ये रूपांतर करण्याच्या एका केंद्रित दृष्टिकोनासह.

ग्रामीण महिला उद्योजकांना त्यांच्या व्यवसायांसाठी स्मार्टफोन आणि इंटरनेटचा अर्थपूर्ण वापर करण्यास मदत करण्यासाठी हा उपक्रम तयार करण्यात आला होता, जो व्यावहारिक आणि स्वतंत्र डिजिटल वापराच्या मूलभूत प्रवेशापलीकडे जाऊन आहे. ५० तासांच्या प्रशिक्षकांच्या नेतृत्वाखालील प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे, सहभागींनी डिजिटल आणि आर्थिक साक्षरता, ऑनलाइन पेमेंट, सामाजिक वाणिज्य, डिजिटल मार्केटिंग, ई-अकाउंटिंग आणि संबंधित सरकारी योजनांची जाणीव या विषयांमध्ये प्रत्यक्ष कौशल्ये आत्मसात केली. या उपक्रमाच्या परिणामाबद्दल बोलताना, नॅसकॉम फाउंडेशनच्या सीईओ ज्योती शर्मा म्हणाल्या, "डिजिटल सक्षमीकरण आत्मविश्वास, स्वातंत्र्य आणि मूर्त आर्थिक प्रगती सक्षम करते तेव्हा ते कायमस्वरूपी प्रभाव निर्माण करते. टिएटोसोबतच्या या सहकार्याने हे दाखवून दिले आहे की केंद्रित, प्रत्यक्ष कौशल्यामुळे २५० ग्रामीण महिला उद्योजकांना केवळ डिजिटल साधने स्वीकारण्यासच नव्हे तर उत्पन्न निर्मिती, बाजारपेठेत प्रवेश आणि व्यवसाय निर्णय घेण्यास प्रभावीपणे कसे सक्षम केले आहे. या निकालांमुळे आमचा असा विश्वास दृढ होतो की जेव्हा महिला योग्य डिजिटल आणि आर्थिक क्षमतांनी सुसज्ज असतात तेव्हा त्या समावेशक विकासाच्या शक्तिशाली चालक बनतात".

टिएटो इंडियाच्या इंडिया अँड अमेरिकाजच्या फायनान्स ऑपरेशन्सचे संचालक आणि प्रमुख अश्वनी बत्रा म्हणाले, "टिएटोमध्ये, आम्हाला विश्वास आहे की तंत्रज्ञान सुलभ, व्यावहारिक आणि समावेशक असेल तरच मूल्य निर्माण करते. नॅसकॉम फाउंडेशनसोबतच्या आमच्या सहकार्याद्वारे, हा उपक्रम ग्रामीण महिला उद्योजकांना पेमेंट, मार्केटिंग आणि व्यवसाय व्यवस्थापनासाठी आत्मविश्वासाने डिजिटल साधनांचा वापर करण्यास सक्षम करण्यावर केंद्रित आहे.

# प्रा. डॉ. नितीन शेळके यांना राज्यस्तरीय 'सह्याद्री भूषण पुरस्कार' जाहीर!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




जय मल्हार आदिवासी विकास सेवा मंडळ यांच्या वतीने दिला जाणारा अत्यंत मानाचा 'श्री संत गाडगे महाराज जीवन गौरव राज्यस्तरीय सह्याद्री भूषण पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. सन २०१६ चे MPSC नियुक्त सहाय्यक प्राध्यापक प्रा. डॉ. नितीन देवराम शेळके यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

डॉ. शेळके यांनी संत गाडगे महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामस्वच्छता आणि सामाजिक प्रबोधनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. "माणसात देव शोधणारा संत" ही गाडगे महाराजांची शिकवण आचरणात आणत त्यांनी शैक्षणिक कार्यासोबत सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श निर्माण केला आहे. पुरस्काराचे स्वरूप: धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि पारमार्थिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. मंडळाच्या वतीने "बाबांच्या पावलांवर पाऊल ठेवून चालणारा निष्ठावंत कार्यकर्ता" अशा शब्दांत डॉ. शेळके यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, या पुरस्कारामुळे त्यांच्या सामाजिक कार्याला अधिक बळ मिळणार आहे. तरुण पिढीसमोर त्यांनी एक प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे.



# पुरी गावाच्या स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन!

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर तालुक्यातील पुरी (गोलवाडे गट ग्रामपंचायत) येथील ग्रामस्थांनी पुरी गावाची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याची मागणी करत जळगाव येथील जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनामध्ये पुरी गावाची सध्याची ग्रामपंचायत विभागणी विभक्त करून नव्याने स्वतंत्र ग्रामपंचायत मान्यता द्यावी, तसेच नव्याने वार्ड रचना करून स्वतंत्र ग्रामपंचायत कार्यालय उपलब्ध करून द्यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. गावात विविध नागरी समस्या निर्माण होत असून, प्रशासकीय अडचणींमुळे विकासकामांना विलंब होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन झाल्यास गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. या निवेदनावर गावातील प्रमुख व्यक्तींच्या सह्या असून त्यामध्ये श्री. सुनील भाऊ तायडे, अ‍ॅड. श्री. आशिष पाटील, पो.पा. किरण पाटील, बापू कोळी, राहुल कोळी, अजय पाटील, उत्तम भालेराव, प्रदीप भालेराव, विजय भालेराव, किशोर पाटील, नितीन पाटील, मनू पाटील, सोपान तायडे, लिलाधर तायडे, मुरलीधर तायडे, सुरज तायडे, प्रमोद पाटील, सागर पाटील, अक्षय कोळी, गोविंदा तायडे, मुरलीधर श्रीधर तायडे, सुधीर पाटील आदींचा समावेश आहे. ग्रामस्थांच्या या मागणीवर प्रशासन काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

# शांताबाई महाले यांचे निधन

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**




संगमनेर तालुक्यातील प्रवरा परिसरातील धांदरफळ येथील सुवर्णकार समाजातील मातोश्री गं.भा शांताबाई दिगंबर महाले वयाच्या 98 व्या वर्षी राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेऊन जगाचा निरोप घेतला .. तर अकोले पाटबंधारे विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र महाले....यांच्या मातोश्री तर दीपक महाले यांच्या आजी होत त्यांच्या पश्चात मुलगी सुना नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार होता त्यांच्यावर प्रवरातील अंत्यसंस्कार करण्यात आलेत्यांच्या अंत्यविधी समय राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# बाटलीत अडकलेल्या काळ्या चट्टापट्ट्या असलेल्या सापाची सुटका

- कल्याण पश्चिम वाडेघर परिसरात रिकाम्या पाण्याच्या बाटलीत अडकलेल्या काळ्या चट्याबट्या सापाची सुटका करून सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी दिले जीवदान

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**



रस्त्यावर फेकलेल्या रिकाम्या पाण्याच्या बाटलीत अडकलेल्या काळ्या चट्याबट्याच्या सापाला सर्पमित्रानं शिताफीनं बाटलीतून सुटका करत त्या सापाला जीवदान दिलं आहे. ही घटना कल्याण पश्चिम भागातील वाडेघर परिसरातील रोनक सिटी मधील शंकर मंदिरासमोर घडली आहे. या सापाला सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी जीवनदान दिलं. विषारी बिन विषारी साप भक्ष्याच्या शोधात मानवी वस्तीत शिरत असल्याच्या घटना सातत्याने घडतच आहेत. आजही मानवी वस्तीत साप शिरल्याची घटना घडली आहे. हवामानात बदल झाल्यानं पहाटेच्या हुडहुडी भरवणाऱ्या थंडीतून ऊब मिळावी म्हणून साप मोकळ्या जागेत येत असतात. कल्याण पश्चिम भागातील वाडेघर परिसरातील रोनक सिटी रोड वरील शंकर मंदिरासमोर काळ्या रंगाचा चट्याबट्याचा साप रिकाम्या बाटलीत अडकून पडल्याचं या परिसरातील नागरिक अभिजित कारभारी यांना दिसले.

अभिजित कारभारी यांनी तातडीनं सर्पमित्र दत्ता बोंबे यांना संपर्क करून या सापाची माहिती दिली. माहिती मिळताच काही वेळातच सर्पमित्र घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर ज्या बाटलीत हा साप अडकून पडला होता. त्या बाटलीचं निरक्षण करुन त्या बाटलीत तंगुसचा बारीक धागा टाकून त्या सापाला शिताफीनं कुठही इजा न होता बाहेर काढलं.

बाटलीतून सापाला बाहेर काढल्यानंतर एका पिशवीत बंद केल्यानं बघणाऱ्या नागरिकांनी सुटकेचा निश्वास घेतला. हा साप दिवड जातीचा असून बिनविषारी आहे. तर त्याचे आवडते खाद्य पाण्यातील मासे आणि लहान बेडूक असतात. इतर सापांच्या तुलनेत हा साप चपळ असतो, अशी माहिती सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी दिली. या दिवड जातीच्या सापाला कल्याण वन विभागाच्या अधिकाऱ्याच्या परवानगीनं निसर्गाच्या सानिध्यात आज सोडण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

# दोन दिवसीय एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**संगमनेरखुर्द: (समर्थ गांवकरी)**



निमगाव बु., ता. संगमनेर, जिल्हा-अहिल्यानगर येथे केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या केंद्रिय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र नाशिकच्या वतीने रब्बी हंगाम २०२५-२६ साठी दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान दोन दिवसीय एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा उद्घाटन समारोह गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये थाटामाटात पार पडला.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाला एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्राचे उप निदेशक डॉ. अतुल ठाकरे यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर मार्गदर्शन करून प्रतिपादन केले की, रासायनिक कीटकनाशकांच्या अशास्त्रीय व वारेमाप वापरामुळे मानवी आरोग्य व शेतीच्या जैवविविधतेवर मोठ्या प्रमाणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, त्याचबरोबर उत्पादन खर्चातही खुप वाढ झालेली आहे. यातून शेतकऱ्यांना बाहेर पडायचे असेल तर कीड व रोगांच्या प्रभावी नियंत्रणासाठी एकत्मिक कीड व्यवस्थापनाचा अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे यासाठी मशगतीय, यांत्रिक, जैविक व रासायनिक या सर्व पध्दतींचा एकत्रित वापर केल्यास कीड व रोगंचे प्रभावी नियंत्रण तर होतेच त्याच बरोबर फक्त रासायनिक कीटकनाशकांवर असणारे अवलंबित्व कमी होऊन उत्पादन खर्चामध्येही बचत होते.

गावचे सरपंच सोमनाथ कानवडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाला उपसंचालक डॉ . अतुल ठाकरे, वनस्पती संरक्षण अधिकारी डॉ शरद गायकवाड, सहायक वनस्पती संरक्षण अधिकारी, ऋषिकेश मानकर, विशाल काशीद व राज्य कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे, सहा. कृषी अधिकारी विजय शेलार तसेच गावातील प्रतिष्ठित खंडू कानवडे, पोलिस पाटील राजेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये विविध तज्ञांचे मार्गदर्शन लाभले, यामध्ये भाजीपाला तसेच मका आणि इतर पिकावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले,

कार्यक्रमस्थळी विविध प्रकारचे सापळे, जैविक कीटकनाशके व फवारणी करताना वापरावयाच्या सुरक्षासाधनांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.यासही शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.

एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्राचे अधिकारी यांनी प्रक्षेत्र भेटी दरम्यान शेतकऱ्यांना कीड व रोगांचे निरीक्षण करून करावयाच्या उपाय योजनांची माहिती करून दिली. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास निमगाव शिवारातील शेतकरीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

# पत्रकारांच्या कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे कुलगुरूंचे आवाहन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंपर्क कार्यालय, आय.क्यू.ए.सी., पी.एम. उषा आणि माध्यमशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने "आधुनिक पत्रकारिता" या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली असून ती आज संपन्न होणार आहे. या कार्यशाळेस पत्रकार बांधवांसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले आहे. या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

# बी जे खताळ जनता विद्यालय धांदरफळ खुर्द विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**संगमनेरखुर्द : (समर्थ गांवकरी)**



धांदरफळ खुर्द येथील बी जे खताळ जनता विद्यालय 2025 26 या वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संचालक दत्ता कोकणे विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश शिंदे, तसेच माजी मुख्याध्यापक अत्तर ,भालेराव, यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते दत्ता कोकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करताना दहावीचे वर्ष आपल्या जीवनात अतिशय महत्त्वाचा आहे. दहावीच्या निकालावरती पुढील शिक्षणाची रणनीती ठरते त्याचप्रमाणे विद्यालयाचा निकाल परंपरेनुसार शंभर टक्के लागतो आणि तो निकाल याही वर्षी शंभर टक्के निकाल लागेल अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता दीपक खताळ व कु. फटांगरे सारिका मनोगत ठोंबरे साक्षी, श्रीकांत, म्हस्कुले, निशा गणेश या विद्यार्थिनी मनोगत व्यक्त केले.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयासाठी प्रत्येक वर्गात सिलिंग फॅन भेट म्हणून दिला.

या कार्यक्रमासाठी संदीप ठोंबरे उपसरपंच योगेश खताळ बांगर सर, घुले सर, कांबळे सर, श्रीमती अकोलकर, श्रीमती बाचकर, राहुल खताळ सर, वाळे मामा तसेच बोराडे मामा उपस्थित होते.ग्राम विकास सेवा संघाचे अध्यक्ष भास्कर खताळ (पाटील) यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाची प्रगती चालू आहे.

# क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यदिनानिमित्त पुण्यात आदरांजली



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्य क्रांतिकारक आणि सशस्त्र क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाणारे वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यदिनानिमित्त संगमवाडी ब्रीजजवळील त्यांच्या स्मारकस्थळी अभिवादन करण्यात आले. फडके स्नेहवर्धिनी तर्फे आयोजित या कार्यक्रमात योगशिक्षक सुभाष बाळकृष्ण फडके, दत्तात्रय लक्ष्मण फडके, चंद्रकांत प्रभाकर फडके, चंद्रकांत दत्तात्रय फडके, दिगंबर गोपाळ फडके, सौ. सुलभा लिमये तसेच श्री व सौ. नंदकिशोर फडके यांनी उपस्थित राहून स्मारकाला पुष्पांजली अर्पण केली. यावेळी उपस्थितांनी वासुदेव बळवंत फडके यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील कार्याची आठवण करून त्यांच्या त्याग व देशभक्तीला अभिवादन केले. त्यांच्या विचारांवर चालत राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# द स्मार्टर ई इंडिया २०२६ बनला गुजरातचा 'ऊर्जेचा महाकुंभ'

**(समर्थ गांवकरी)**

भारताची स्वच्छ ऊर्जा यात्रा आता केवळ लक्ष्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती अंमलबजावणीच्या नव्या टप्प्यात प्रवेशली आहे. अशा वेळी तंत्रज्ञान, उत्पादन आणि धोरणांशी संबंधित संवाद एकाच व्यासपीठावर आणणाऱ्या प्लॅटफॉर्मचे महत्त्व वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर गुजरात – उदयोन्मुख ऊर्जा केंद्र म्हणून – पुन्हा एकदा 25 ते 27 फेब्रुवारीदरम्यान गांधीनगर येथे द स्मार्टर ई चे आयोजन करत आहे. हा कार्यक्रम गुजरातमधील सर्वात मोठ्या स्वच्छ ऊर्जा प्रदर्शनाच्या रूपात स्थापित होत असून उद्योगजगत त्याला 'ऊर्जेचा महाकुंभ' असे संबोधत आहे.

मेस्से मुएनचेन इंडिया चे सीईओ आणि आईएमईए चे अध्यक्ष भूपिंदर सिंह म्हणाले की ऊर्जा क्षेत्रातील चर्चांचे स्वरूप आता बदलले आहे. भारत आता केवळ उद्दिष्टांवर चर्चा करत नाही, तर अंमलबजावणी, पुरवठा साखळी आणि देशांतर्गत उत्पादनातील स्पर्धेवर लक्ष केंद्रित करत आहे. द स्मार्टर ई इंडिया हा बदलच दर्शवतो, त्यामुळे उद्योग त्याला ऊर्जा महाकुंभ मानू लागला आहे.

जागतिक स्तरावरही भारताच्या स्वच्छ ऊर्जा निर्णयांवर लक्ष ठेवले जात आहे. सोलर प्रमोशन इंटरनॅशनल चे व्यवस्थापकीय संचालक फ्लोरियन वेसेंडॉर्फ म्हणाले की मोठ्या प्रमाणावर ऊर्जा परिवर्तन कसे अंमलात आणले जाते याचे जागतिक उदाहरण भारत बनत आहे. येथे होणारे बदल जागतिक पुरवठा साखळी आणि तांत्रिक प्राधान्यांवर प्रभाव टाकतात. द स्मार्टर ई इंडिया मधील वाढती आंतरराष्ट्रीय सहभागिता याच रुचीचे द्योतक आहे.

या आयोजनात 300 हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार असून ते सौर ऊर्जा, ऊर्जा साठवण, इलेक्ट्रिक मोबिलिटी, पायाभूत सुविधा आणि संपूर्ण ऊर्जा प्रणालींच्या विविध घटकांशी संबंधित असतील. ही व्यापक सहभागिता दर्शवते की भारताचा नवीकरणीय ऊर्जा परिसंस्था आता अशा मंचांभोवती संघटित होत आहे, जिथे तंत्रज्ञान, धोरण आणि व्यावसायिक निर्णय एकत्रितपणे समोर येतात.

कार्यक्रमात 19,000 हून अधिक व्यावसायिक अभ्यागत, 300 हून अधिक विचारवंतांची परिषदेत उपस्थिती आणि 60 हून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहेत. हे तज्ञ विविध मंचांवर – जसे की परिषद: Adoption to Leadership: Powering Atmanirbhar Bharat through Technological Innovation, Voices of India Energy Leader – The Smarter E India Podcast Series आणि Innovator and Start-up Arena – चर्चा करतील.

कार्यक्रमाच्या व्यापक प्रभावाचा विचार करून अभिनेते प्रतीक गांधी यांची द स्मार्टर ई इंडिया 2026 चे ब्रँड अ‍ॅम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयोजकांच्या मते, यामुळे स्वच्छ ऊर्जा आता भारताच्या अर्थव्यवस्था, उत्पादन, पायाभूत सुविधा विकास आणि रोजगारनिर्मितीशी घट्टपणे जोडली गेली असल्याचे स्पष्ट होते.

मेजबान राज्य म्हणून गुजरातची निवड भारताच्या नवीकरणीय ऊर्जा प्रवासातील त्याच्या वाढत्या भूमिकेचे प्रतीक आहे. मागील काही वर्षांत गुजरात मोठ्या प्रमाणातील सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्पांसह आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टांशी संबंधित उत्पादन विस्ताराचे प्रमुख केंद्र म्हणून उदयास आले आहे.

2026 आवृत्तीचे मुख्य आकर्षण Adoption to Leadership: Powering Atmanirbhar Bharat through Technological Innovation या विषयावर आधारित परिषद असेल. यात भारत मोठ्या स्वच्छ ऊर्जा बाजारापासून पुढे जाऊन तांत्रिक विकास आणि उत्पादन क्षेत्रात जागतिक नेतृत्व कसे मिळवू शकतो यावर चर्चा होईल.

परिषदेत प्रकल्प विकास, उत्पादन, धोरण आणि आंतरराष्ट्रीय उद्योग संघटनांशी संबंधित तज्ञ सहभागी होतील. चर्चेचे मुख्य विषय उत्पादन विस्तार, ग्रिड एकात्मीकरण, ऊर्जा साठवण, वित्तपुरवठा आणि धोरणात्मक समन्वय असे असतील – जे येत्या दशकात भारताच्या ऊर्जा स्पर्धात्मकतेला आकार देतील.

ट्रेड फेअरमध्ये Innovator and Start-up Arena देखील असेल, जिथे प्रारंभिक टप्प्यातील कंपन्या ऊर्जा साठवण, इलेक्ट्रिक वाहन परिसंस्था, ग्रिड इंटेलिजन्स आणि प्रगत सौर उत्पादनाशी संबंधित तंत्रज्ञान सादर करतील. यासोबत Voices of India Energy Leader – The Smarter E India Podcast Series देखील प्रदर्शनासोबत चालणार आहे.

# भंडारदरा अभयारण्यातून वन्यजीवांचा शेतपिकांवर हल्ला; पंचनाम्याची मागणी!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

भंडारदरा अभयारण्य परिसरालगतच्या गावांमध्ये वन्यजीवांकडून शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अकोले तालुक्यातील मुतखेल, रतनवाडी, घाटघर आदी भागांतील भुईमूग, भाजीपाला, टोमॅटो, ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा या पिकांचे रानडुक्कर, हरिण, गवा, माकड व वानरांकडून रातोरात नुकसान होत आहे.

या पार्श्वभूमीवर मा. आ. वैभव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवक अनंत महादू घाणे व परिसरातील शेतकऱ्यांनी मा. उमेश गावित (RFO) यांना निवेदन देऊन तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. या वेळी तुकाराम खाडे, सखाराम उंबरे, बुधा पाटील इदे, अमृता झडे, बाजीराव सगभोर, हनुमंता बुळे, योगेश खाडे, सुभाष बांडे, तुकाराम सारुकते, किसन आंबवणे आदी उपस्थित होते.




बैठकीत शेती संरक्षणासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. अभयारण्यात व लगतच्या क्षेत्रात आंबा, चिंच, पिंपळ, आवळकंठी, वड, उंबर यांसारखी फळझाडे मोठ्या प्रमाणात लावून वन्यप्राण्यांसाठी नैसर्गिक खाद्य उपलब्ध करून द्यावे, तसेच नैसर्गिक व कृत्रिम पाणवठे तयार करावेत, अशी सूचना करण्यात आली.

पर्यटकांकडून होणारा प्लास्टिक व इतर कचरा टाळण्यासाठी कचराकुंड्या बसवाव्यात, प्लास्टिकविरोधी जनजागृती मोहीम राबवावी आणि जंगल व वन्यजीवांचे संरक्षण करावे, अशी मागणीही करण्यात आली. पर्यटकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला.

दरम्यान, बिबट्यांची संख्या वाढल्याने शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. अनेक वेळा बिबट्या शिकार तोंडात घेऊन निघून जात असल्याने किंवा पुरावे न सापडल्याने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यात अडचणी येत आहेत.

त्यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत व शासनाकडून भरीव आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

याबाबत उमेश गावित यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत लवकरच पंचनामे करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# बुलढाणा नगरपालिका हद्द वाढीला नागरिकांचा विरोध

## जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला भव्य जन आक्रोश मोर्चा

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

नगर पालिकेच्या हद्द वाढीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नगर विकास विभागाला प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. यामध्ये बुलढाणा शहरालगत असलेल्या सुंदरखेड, सागवान, माळविहीर, येळगाव या गावांचा समावेश आहे. मात्र या निर्णयाला नागरिकांचा विरोध होत आहे.आज या विरोधात चारही गावातील नागरिक प्रा डी एस लहाने यांच्या नेतृत्वात रस्त्यावर उतरले होते. जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य असा मोर्चा काढन्यातआला. आम्हाला गावची ग्रामपंचायतच हवी असा सूर यावेळी निघाला तर नगरपालिकेची हद्द वाढ मुळीच करण्यात येऊ नये. ग्रामपंचायती हद्दीतच गावांचा विकास झाला पाहिजे असे मत प्रा. डी एस लहाने यांनी मोर्चाला संबोधित करतेवेळी मांडले.



दुपारी बारा वाजता रेस्ट हाऊस परिसरातून मोर्चाला सुरुवात झाली. हातात फलक घेतलेले शेकडो आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचले. तिथेच प्रा. डी एस लहाने,सुनिल सोनुने, ॲड. दशरथसिंग राजपूत, सतिष भाकरे पाटील, रविंद्र भाकरे पाटील, प्रतिक जाधव, सुरेश कंकाळ, श्रीकांत जाधव, व इतर गावातील सरपंचांनी मोर्चाला संबोधित केले. यानंतर जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. सादर करण्यात आलेल्या निवेदनानुसार नगरपालिकेमध्ये आमच्या गावाचा समावेश करण्यात येऊ नये अशा पद्धतीचे सर्वच ग्रामपंचायतीने ठराव घेतले आहे. गावचा विकास नगरपरिषद हद्दीत समाविष्ट करून नव्हे तर ग्रामपंचायती त्यासाठी सक्षम आहे. त्यामुळे ही गावे ग्रामपंचायतीत आहे तशी राहावी अन्यथा या निर्णयाविरोधात यापुढे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबत सामाजिक विकासही नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून साध्य होणार

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे घटक व त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे उपक्रम" या विषयावरील कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे माजी कुलगुरू तथा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. नितीन करमळकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन केले. ते म्हणाले की, गेल्या ७०–७५ वर्षांत अभ्यासक्रमात फारसा बदल झाला नव्हता; मात्र नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम, कौशल्यविकास आणि सामाजिक भान या सर्व बाबींचा सखोल विचार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना केवळ



पदवीपर्यंत मर्यादित न ठेवता त्यांच्या सामाजिक, बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे हेच या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. देशातील सुमारे २० टक्के विद्यार्थी केंद्रीय विद्यापीठांमध्ये तर ८० टक्के विद्यार्थी राज्य विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असल्यामुळे या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी राज्य विद्यापीठांमधून होणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणातून सर्वगुणसंपन्न पिढी घडविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे हे विद्यापीठांचे प्रमुख ध्येय असून मराठवाड्यातील विद्यार्थी अत्यंत गुणवंत आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, आयक्यूएसी संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. संतराम मुंडे, डॉ. संगीता माकोने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केली, तर सूत्रसंचालन आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांनी केले.

# घरातील माय गोठ्यातील गाय सुखी तेव्हाच देश समृद्ध

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

देव कोणत्याही मंदिरात नसतो फक्त मंदिर हे श्रद्धेचे ठिकाण असते खरा देव तर आपल्या माणुसकीत असतो आपण माणुसकी जपली पाहिजे आपण दोष मुक्त होऊन यावे आणि भक्त होऊन जावे हेच कीर्तनातील रहस्य आहे ज्या घरात प्रेम असते त्या घरी देव असतो म्हणून आपण एक वेळेस उपाशी राहावे पण दुखी समदुखी शेजारच्या लोकांना आपण माणुसकीच्या नात्याने आधार द्यावा असे अमृतवाणी विचार शिभप मोहनराव कावडे महाराज हसनाळीकर यांनी आयोजित कीर्तनरुपी सेवेत दिले. नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह समस्त गावकऱ्यांच्या वतीने आयोजित केला होता.

# काँग्रेसला बदनाम करण्याचा कुटील डाव - खा. रवींद्र चव्हाण

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

काँग्रेस पक्षाची विचारधारा सर्व जाती धर्माला घेऊन चालणारी असल्याने जनतेमध्ये संभ्रम निर्माण करून पक्षप्रवेशाच्या वल्गना करणे म्हणजे पक्षाला बदनाम करण्याचा कुटील डाव असून पक्ष संघटन मजबुतीसाठी कार्यकर्त्यांनी वज्रमुठ बांधली असून राजकारणात काहीही होऊ शकते तेच नेते भविष्यात काँग्रेस पक्षात येऊ शकतात अशी गुगली टाकत भाजप पक्षप्रवेशाला पूर्णविराम दिला आहे.

मुदखेड तालुका काँग्रेस जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन ता. १४(शनिवार) खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले आहे. माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोतावर अध्यक्षस्थानी होते. काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक यशपाल भिंगे , जिल्हा कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर,



किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधव पवळे , तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, उबाठा सेनेचे तालुकाप्रमुख पिंटू पाटील वासरीकर, जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पुयड , जिल्हा सचिव सूर्यकांत चौदंते, गिरीश कोत्तावार , युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष मुजीब पठाण,गंगाधर डांगे, नवनिर्वाचित नगरसेवक अविनाश चौदंते, संजय बोकेफोड , कदीर भाई, माझी उपनगराध्यक्ष करीम साब यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी तालुक्यात प्रत्येक गावागावात काँग्रेसची विचारधारा पोहोचून संघटन मजबुतीसाठी वज्रमुठ बांधण्याचा निर्धार केला आहे. यावेळी बोलताना खा.रवींद्र चव्हाण म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपचे नेते काँग्रेस पक्षाची बदनामी करण्याचा धंदा सुरू केला आहे. काँग्रेसचे मजबुतीकरण आता पक्षात राहून मोठमोठे पदे उपभोगणाऱ्या नेत्याच्या मतदारसंघा पासूनच सुरुवात करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. प्रा.यशपाल भिंगे यांनी सध्या केंद्रातील व राज्यातील सरकार सर्वसामान्य जनतेचे शोषण करीत असून हिंदुत्वाच्या नावावर जातीजातीत भांडणे लावून दिशाभूल करीत असल्याचे सडकून टीका मोदी सरकारवर केली. यावेळी पप्पू पाटील कोंडेकर यांनी भविष्यात काँग्रेसला चांगले दिवस येणार असून भाजपाच्या फोडाफोडीच्या राजकारणाच्या प्रलोभनाला बळी न पडता काँग्रेसने आता निष्ठावंताच्या साह्याने आपला पक्ष बळकट करण्याचा निर्धार केला आहे. यावेळी राजेश पवार निवघेकर , रमेश बोडके, विश्वनाथ पवार, महेश देशमुख,भगवान पवार, बळवंत पाटील पुयड, शिवाजी वडजे, नागोराव भांगे, सुनील निखाते, माधव अक्कमवाड, मुलतानी, माणिकराव मुंगल, कुलदीप मल्लेवार , वेदांत शेवटे, तेजस जाधव , संभाजी गाडे , सुरेश गोवंदे, गणेश सूर्यतळे, महेश पवार, नंदु पवार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाणी योजनेपासून नागरी सुविधांपर्यंत मते यांची धडपड

## खासदार नीलेश लंके यांचा गौरव : पारनेरमध्ये २०० सार्वजनिक बाकांचे लोकार्पण

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक बांधिलकी आणि लोकसहभाग यांचा मिलाफ साधत पारनेर शहरात नगरसेवक योगेश मते यांच्या वतीने तब्बल २०० सार्वजनिक बाक बसविण्याच्या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. शहरातील सर्व प्रभागांमध्ये नागरिकांना बसण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम लोकाभिमुख कार्यपद्धतीचे उदाहरण असल्याचे मत खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केले. या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

खा. लंके म्हणाले, पारनेर ग्रामपंचायत सदस्य म्हणून कारकीर्द सुरू करून नगरपंचायत नगरसेवक पदापर्यंतचा प्रवास करताना योगेश मते यांनी शहरातील प्रत्येक प्रश्न स्वतःचा समजून हाताळला.




पाणी, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा, धार्मिक स्थळांवरील सोयीसुविधा अशा विविध विषयांवर सातत्याने पाठपुरावा करून त्यांनी प्रशासनाला निर्णय घेण्यास भाग पाडले."

शहराच्या विकासाचा प्रश्न असो किंवा नागरिकांच्या दैनंदिन अडचणी मते नेहमी आघाडीवर असतात. त्यांचा निस्वार्थ सेवाभाव इतर लोकप्रतिनिधींसाठी आदर्श आहे," असे लंके यांनी नमूद केले.

पारनेरच्या पाणीटंचाईचा कायमस्वरूपी प्रश्न सोडविण्यासाठी शाश्वत पाणी योजना राबविण्याचा निर्णय झाल्यानंतर प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारी मते यांनी स्वीकारली. सहकारी नगरसेवकांना सोबत घेऊन त्यांनी आराखडा पूर्ण केला. तांत्रिक मंजुरीसाठी नगरपंचायतीमार्फत शासनाकडे ७३ लाख रुपये जमा करण्यात आले असून अंतिम सहीसाठी प्रस्ताव मंत्रालयात प्रलंबित आहे. "या योजनेचे श्रेय मते व त्यांच्या सहकारी नगरसेवकांचेच आहे," असे लंके यांनी स्पष्ट केले.

मते एकटे काम न करता सहकाऱ्यांना सोबत घेऊन काम करतात. त्यामुळे प्रभागनिहाय कामांना गती मिळते. "लोकप्रतिनिधीने स्वतः पुढाकार घेतल्यास संपूर्ण टीम प्रेरित होते.

पारनेरमध्ये ते चित्र दिसते," असे लंके म्हणाले. भविष्यातही ही टीम नागरिकांचा विश्वास अबाधित ठेवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# साजन बेंद्रेचा कार्यक्रम

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

लहुजी शक्ती सेना, हदगाव हिमायनगर मतदार संघ यांच्या वतीने शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता तामसा ता.हदगाव,जि.नांदेड येथील जिल्हा परिषद हायस्कूल मैदानावर "मातंग समाज परिषद" मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांच्या गायणाच्या माध्यमातुन प्रबोधन व मातंग समाजाच्या शैक्षणिक,आर्थिक,सामाजिक व राजकीय प्रगतीच्या दृष्टीने सखोल चर्चा व्हावी समाजातील विविध प्रश्नांवर मार्गदर्शन मिळावे आणि भावी दिशा निश्चित व्हावी या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मातंग समाजातील युवक,महिला,ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

# पठारवाडी गायरान जमीन प्रकरणात ग्रामपंचायतीच्या हस्तक्षेपाला न्यायालयाची मंजूरी

**निघोज : (समर्थ गांवकरी)**

## जिल्हा न्यायालयाचा निर्णय

पारनेर तालुक्यातील पठारवाडी येथील सुमारे ६५० एकर गायरान जमीन येथील काही लोकांनी हडपण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणात सरपंच ग्रामपंचायत पठारवाडी व गायरान बचाव समितीचा न्यायालयात दाखल केलेला हस्तक्षेप अर्ज अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयाने मंजूर केला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,

पठारवाडी येथे शासनाची सुमारे साडेसहाशे एकर गायरान जमीन आहे. सुमारे शंभर वर्षांपासून या

जमिनीच्य सातबारा वर शासन / गावकऱ्यांची गुरे चरण्याकरिता राखीव / पडित जमीन असे शेरे आहेत, असे असताना येथील काही लोकांनी सदर जमिनीवर भोर संस्थानचे तत्कालिन राजे शंकरराव पंतसचिव यांचे वारस आणि कुळ असल्याचा दावा करून या जमिनीवर मालकी हक्क सांगितला होता. सदर विषयाचा दावा त्यांनी अहमदनगर येथील दिवाणी न्यायालयात चार वर्षांपूर्वी दाखल केलेला होता. सुरवातीला या प्रकरणात न्यायालयाने पठारवाडी ग्रामस्थांच्या वहिवाटीला मनाई घालण्याचा हुकूम केला होता. तसेच जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचा दावा रद्द करण्याचा केलेला अर्ज फेटाळून जिल्हाधिकारी यांना एक हजार रुपये दंड केला होता.

या निर्णयाचे विरुद्ध जिल्हा अधिकारी अहिल्यानगर यांनी मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात अपिल केले आहे.

त्यानंतर,पठारवाडी ग्रामस्थांनी विशेष ग्रामसभा बोलावून गायरान बचाव समितीची स्थापना केली व न्यायालयात धाव घेत हस्तक्षेप अर्ज दाखल केला. चुकीची माहिती आणि कागदपत्रांच्या आधारे वादिने न्यायालयाची दिशाभूल करून पठारवाडी ग्रामस्थांच्या वहिवाटीला मनाई हुकूम मिळवला असल्याचे पुरावे गायरान बचाव समितीकडून न्यायालयासमोर ठेवण्यात आले. गायरान बचाव समितीकडून सत्य परिस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली, तसेच यापेक्षा अधिकचे पुरावे समितीकडे उपलब्ध असुन ते न्यायालयासमोर सादर करण्यासाठी पठारवाडी ग्रामस्तांचा दाव्यात समावेश करण्याची मागणी अर्जाद्वारे न्यायालयाकडे करण्यात आली होती.

# कपिल इलेव्हन संघ खासदार चषकचा ठरला विजेता

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

- अझहर इलेव्हन संघ उप विजेता
- युवकांसाठी मैदानी खेळ काळाची गरज - खा. रवींद्र चव्हाण

नागेली (ता मुदखेड ) क्रिकेटच्या साखळी सामन्यातील खासदार चषकचा विजेता कपिल इलेव्हन संघ मुदखेड ठरला असून उपविजेतेपद माळकौठा च्या अझर इलेव्हन क्रिकेट संघाने पटकाविले असून ग्रामीण भागातील क्रिकेट प्रेमी खेळाडूंना वाव मिळाला असून युवा पिढीसाठी मैदानी खेळ काळाची गरज असल्याचे प्रतिपादन खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले आहे. स्वातंत्र्य सेनानी स्मरणार्थ खासदार चषक क्रिकेट साखळी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील 60 क्रिकेट संघांनी सहभाग घेतला होता. क्रिकेट साखळी सामन्यात अंतिम फेरीत कपिल इलेव्हन संघ तसेच अजहर इलेव्हन संघ यांच्यात रोमांचक सामना झाला. या अतितटीच्या सामन्यात कपिल इलेव्हन संघ खासदार चषक विजेता ठरला आहे. यावेळी खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्त विजेत्या संघास ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ३३३३३/- रुपये देऊन सन्मानित करण्यात आले आहे. उपविजेता संघास जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर यांच्या हस्ते ट्रॉफी ,सन्मानचिन्ह, रोक २२२२२/- रुपये देऊन संघाचा गौरव करण्यात आला. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या हस्ते ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ११११११/- रुपये देऊन संघास प्रोत्साहित करण्यात आले आहे.

# मराठा पाटील युवक समितीचा वार्षिक मेळावा दिमाखात संपन्न

## मराठा समाजाचा सन्मान गौरवाने उल्लेखनीय व्यक्तींचा सत्कार केला

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

वैचारिक प्रबोधनातून मराठा समाजाचा सर्वांगाने उत्कर्ष साधण्याचा प्रयास येणाऱ्या काळात करु.सर्वच समाजाच्या वेदनेवर फुंकर घालण्यासाठी सदैव कार्यतत्पर राहू असे मत गजानन ढगे पाटील यांनी व्यक्त केले.

समाजकार्यामध्ये मागील 19 वर्षापासून सातत्याने कार्यरत असणाऱ्या मराठा पाटील युवक समितीचा विसावा वार्षिक मेळावा तथा नविन कार्यकारीणीची निवड सभा नुकतीच खामगाव येथील चौपाटी हॉल येथे सपन्न झाली. यावेळी मराठा युवक समितीचे संस्थापक अध्यक्ष गजानन ढगे पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना उपरोक्त मत व्यक्त केले. महापुरुषांना सामूहिक अभिवादन तथा स्व. अजितदादा पवार यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करून सभेला सुरूवात करन्यात आली.यावेळी मा. जिल्हाध्यक्ष प्रवीण उर्फ छोटू पाटील, सुनील पाटील, प्रा.भूषण गावंडे, प्रबोधनाकार ॲड.सतीशचंद्र रोठे पाटील यांनी समोयचीत मनोगत व्यक्त करीत सभेला संबोधित केले. सुत्रसंचालन प्रा.उद्धव गावंडे सर यांनी तर आभार श्याम अढाव यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील शासकीय,प्रशासकीय, वैद्यकीय, विधी, औद्योगिक, व्यवसायीक,शेती, सामाजिक, सांस्कृतिक, पोलीस पत्रकार अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मराठा समाज बांधवांचा मराठा भूषण सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करीत सत्कार करण्यात आला. नवनिर्वाचित जिल्हा कार्यकारणी गठीत.

सलग दोन वर्षानंतर गठीत होना-या समितीची नविन कार्यकारीणी यावेळी सर्वानुमते ठराव घेऊन पारित करण्यात आली. त्यामध्ये जिल्हाध्यक्ष , तालुकाध्यक्ष,शहराध्यक्ष, विध्यार्थी समिती आदींची सर्वानुमते निवड करुन नियुक्ती पत्र देण्यात आले.

जिल्हाध्यक्ष मोहन घुईकर,विद्यार्थी समिती जिल्हाध्यक्ष श्याम मोरखडे,संपर्क प्रमुख प्रवीण पाटील, योगेश म्हैसागर,मंगेश सातव यांची



नियुक्ती करण्यात आली. तर खामगाव तालुकाध्यक्ष अविनाश कुटे, शहराध्यक्ष प्रतीक मिरगे, विद्यार्थी समिती अध्यक्ष राजेश पाटील,रुग्णसेवा समिती अध्यक्ष रमेश अवचार, नांदुरा तालुकाध्यक्ष दीपक ढोले, शहराध्यक्ष प्रथमेश जुनारे, विद्यार्थी समिती नांदुरा मलकापुर तालुकाध्यक्ष पंकज पाटील, मलकापुर शहराध्यक्ष भूषण पाटील, मलकापुर विद्यार्थी समिती पदी राहुल मापारी, शेगाव तालुकाध्यक्ष ऋषीकेश हिंगणे, शेगाव शहराध्यक्ष नंदकिशोर सहस्त्रबुद्धे, शेगाव तालुका विद्यार्थी समिती अध्यक्ष सागर जवंजाळ, मोताळा तालुकाध्यक्ष दीपक शेळके / संभाजी हाडे, शहराध्यक्ष विलास जुनारे, मोताळा विद्यार्थी समिती अध्यक्ष पवन जुनारे, जळगाव तालुकाध्यक्ष आकाश जाणे, जळगांव शहराध्यक्ष पदी विशाल झाटे पाटील, मेहकर

तालुकाध्यक्ष कैलास पाचपोर, संग्रामपुर तालुकाध्यक्ष दत्तात्रय बकाल, यासह जिल्ह्यातील तालुका आणि शहर अध्यक्ष व इतर समित्यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ति पत्र प्रदान करीत समाज बांधवांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कारही करण्यात आला.

# बसस्थानकाच्या स्लॅबवर 'मंजूर'ऐवजी अन्य कंपनीचे सिमेंट?

## निविदा अटींचा भंग झाल्याचा संशय; गुणवत्ता अहवाल गुलदस्त्यात

**हिंगोली : (समर्थ गांवकरी)**

वसमत शहरात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येत असलेल्या नवीन बसस्थानकाच्या बांधकामावर पुन्हा संशयाचे ढग दाटले आहेत. बसस्थानकाच्या मुख्य स्लॅबचे काँक्रिटीकरण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, या कामात निविदेत मंजूर असलेल्या सिमेंटऐवजी अन्य कंपनीचे सिमेंट वापरण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. निविदा कागदपत्रांमध्ये सिमेंटसाठी ठरावीक कंपन्यांचेच साहित्य वापरणे बंधनकारक असताना प्रत्यक्ष ठिकाणी यादीबाहेरील सिमेंटचा वापर झाल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे नियमबाह्य साहित्य वापरून सार्वजनिक निधीचा गैरवापर झाल्याचा मुद्दा उपस्थित होत आहे.



विशेष म्हणजे, स्लॅबचे काँक्रिटीकरण पूर्ण होऊनही अद्याप नमुना चाचणी अहवाल, गुणवत्ता तपासणी अहवाल तसेच संबंधित अभियंत्याची लेखी मंजुरी सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे "काम योग्य झाले असेल, तर अहवाल व कागदपत्रे समोर का येत नाहीत?" असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

तज्ज्ञांच्या मते, स्लॅबसारख्या महत्त्वाच्या बांधकामात हातोडी चाचणी, ध्वनीलहरी चाचणी तसेच कोर कापून प्रयोगशाळेमार्फत तपासणी करणे आवश्यक असते. मात्र यासंबंधी कोणताही अधिकृत अहवाल अद्याप समोर आलेला नाही. या प्रकरणावर संबंधित विभाग व प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही.

बसस्थानकाच्या मुख्य स्लॅबच्या काँक्रिटीकरणावेळी वाळूचा साठा कामाच्या ठिकाणी आढळून आला नाही. प्रत्यक्षात त्या ठिकाणी डस्टचाच साठा वापरण्यात आल्याचे छायाचित्रांमधून स्पष्ट दिसून येत आहे.

आरसीसीसारख्या महत्त्वाच्या बांधकामासाठी दर्जेदार वाळूचा वापर अपेक्षित असताना डस्टचा वापर झाल्यास काँक्रिटच्या मजबुतीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या स्लॅबची हातोडी चाचणी, ध्वनीलहरी चाचणी तसेच कोर कापून प्रयोगशाळेमार्फत तपासणी होणे आवश्यक ठरत आहे.

मुख्य स्लॅब देखील डस्ट मध्ये पायाभरणीपासून बस स्थानकाचे बांधकाम हे डस्ट मध्ये तयार करण्यात आलेल्या आहेत व आता काही तासापूर्वी तयार करण्यात आलेले बस स्थानकाचे मुख्य स्लॅब देखील डस्ट मध्ये तयार केल्याचे पहावयास मिळाले आहे परंतु इस्टिमेट मध्ये धुतलेले वाळू असा स्पष्ट उल्लेख असताना प्रत्यक्षात मात्र डस्ट मध्ये स्लॅब तयार केला बांधकाम तज्ञांच्या मते सेंट्रिंग उघडतात डस्ट मध्ये तयार करण्यात आलेल्या तडे जातील असा दावा करत आहेत

कोट्यवधींच्या निधीतून सुरू असलेल्या या महत्त्वाच्या बांधकामात काँक्रिटीकरणानंतरही गुणवत्ता तपासणी अहवाल समोर न आल्याने संशय अधिक गडद झाला आहे. गुणवत्ता तपासणी न झाल्यास भविष्यात संरचनेच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# सापुतारा रोपवे प्रकल्पातील मेंटेनन्स कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांपासून पगार नाही; ₹५.६० लाख थकबाकीप्रकरणी कलेक्टरकडे धाव!

**डांग (गुजरात): (समर्थ गांवकरी)**

सापुतारा येथील पर्यटकांचे आकर्षण ठरलेला रोपवे प्रकल्प सध्या आर्थिक अनियमिततेमुळे चर्चेत आला आहे. रोपवेच्या ऑपरेशन व मेंटेनन्सची जबाबदारी सांभाळणाऱ्या खासगी एजन्सीच्या कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्रस्त कर्मचाऱ्यांनी याप्रकरणी डांग जिल्हाधिकाऱ्यांकडे ई-मेलद्वारे लेखी तक्रार करून न्यायाची मागणी केली आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी दिवस-रात्र प्रामाणिकपणे सेवा बजावूनही कंपनी व्यवस्थापनाने त्यांच्या हक्काचे तब्बल ₹५,६०,००० इतके वेतन थकवले आहे. त्यामुळे अनेकांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले असून दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार,



राजस्थानातील भीनमाल येथील आशीर्वाद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स या संस्थेकडे सापुतारा रोपवेच्या संचालन व देखभालीची जबाबदारी होती. नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत संस्थेने तांत्रिक व व्यवस्थापकीय कामकाज सांभाळले. संस्थेचे प्रतिनिधी अभियंता बापुजी परिडा यांनी सांगितले की, पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांनी जबाबदारीने काम पूर्ण केले. मात्र देयकाच्या बाबतीत कंपनीकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

व्यवस्थापकीय संचालकाशी वारंवार संपर्क साधूनही कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोन महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांना मानसिक व आर्थिक तणावाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे संबंधित एजन्सीला तात्काळ थकबाकी अदा करण्याचे आदेश द्यावेत, अन्यथा कायदेशीर कारवाई करून कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करावे, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, सापुतारा सारख्या महत्त्वाच्या पर्यटनस्थळी अशा प्रकारची घटना उघडकीस आल्याने स्थानिक प्रशासन व पर्यटन विभागाच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता जिल्हा प्रशासन या प्रकरणात किती वेगाने आणि ठोस पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# काशी विश्वनाथ महादेव मंदिर, सिरसमणी येथे यात्रा उत्सव व भव्य कुस्ती दंगल उत्साहात संपन्न

**कळवण : (समर्थ गांवकरी)**

कळवण तालुक्यातील सिरसमणी गावात असलेल्या काशी विश्वनाथ महादेव मंदिर, सिरसमणी येथे वार्षिक यात्रा उत्सव व पारंपरिक कुस्ती दंगल कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती. "हर हर महादेव" च्या जयघोष यात्रेनिमित्त मंदिरात विशेष अभिषेक, पूजाअर्चा व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. दूरदूरच्या गावांमधून भाविकांनी हजेरी लावून महादेवाच्या चरणी नतमस्तक होत कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. भक्ती, श्रद्धा आणि एकात्मतेचे सुंदर दर्शन या यात्रेत पाहायला मिळाले. यात्रेचा मुख्य आकर्षण ठरला तो पारंपरिक कुस्ती दंगल कार्यक्रम. परिसरातील नामांकित मल्लांनी मैदानात दमदार झुंजी देत प्रेक्षकांची मने जिंकली. ग्रामीण भागातील पारंपरिक खेळांची परंपरा जपणारा हा उपक्रम युवकांना प्रेरणा देणारा ठरला. आजच्या आधुनिक युगात मोबाईल आणि आभासी जगात रमलेल्या तरुणाईला मातीच्या सुगंधाशी जोडण्याचे काम या कुस्ती दंगलीने केले, असे उपस्थित ज्येष्ठांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन पंच कमिटीने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले होते. भाविकांची गर्दी लक्षात घेता पोलीस प्रशासनानेही काही कर्मचारी नियुक्त करून सुरक्षेची योग्य व्यवस्था केली होती. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत व सुरळीत पार पडला. यावेळी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामविकास अधिकारी तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक प्रमुख म्हणून उपस्थित होते. सर्वांनी मिळून यात्रेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

> ग्रामीण संस्कृतीची ओळख म्हणजे अशा यात्रा आणि पारंपरिक दंगल. या केवळ धार्मिक सोहळे नसून सामाजिक ऐक्य, परंपरा आणि संस्कृती जपण्याचे माध्यम आहेत. आज गावागावात वाढणाऱ्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अशा उत्सवांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. युवकांना व्यसनमुक्ती, क्रीडा आणि संस्कार यांची जोड देणारे हे उपक्रम अधिक व्यापक व्हावेत, हीच अपेक्षा.
>
> **- मा. उपसरपंच विद्यमान सदस्य श्रीकांत वाघ**

# योग वेदांत सेवा समितीच्या वतीने राहुरीत मातृ पितृ पूजन दिवस

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

आई-वडिलांबद्दल प्रेम आदर व्यक्त करण्यासाठी सौ भागीरथीबाई तनपुरे कन्या प्राथमिक विद्यालय राहुरी येथे श्री योग वेदांत सेवा समिती राहुरी यांच्या वतीने मातृ पितृ पूजन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेची पूजन करण्यात आले, या निमित्ताने मुलाने आपल्या आई-वडिलांचे तिलक लावून हार पुष्प अर्पण करून पूजन केले. मुलांना पाश्चात्य संस्कृती पासून दूर ठेवणे,आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे व आपल्या आई-वडिलांचा आदर करणे करिता श्री योग वेदांत समितीकडून सोमवारी मातृ-पितृ पूजन करण्यात आला.

# श्री शनेश्वर देवस्थानचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी निविदा प्रक्रियेवर भर

## विशिष्ट ब्रँडची मक्तेदारी संपुष्टात येऊन देवस्थान व भाविकांना लाभ - डॉ. प्रवीण गेडाम

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शनि शिंगणापूर येथील श्री शनेश्वर देवस्थान येथील बर्फी प्रसाद तयार करण्यासाठी शिर्डी देवस्थानच्या धर्तीवर प्रक्रिया करून पुरवठादार नेमल्याने विशिष्ट ब्रँडची मक्तेदारी संपुष्टात येऊन देवस्थान आणि भाविकांनादेखील याचा लाभ होणार आहे. प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्यानंतर बर्फी प्रसाद आणि तेलाची विक्री वाढल्याचे गेल्या ३ महिन्याच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते, असे स्पष्टीकरण विभागीय आयुक्त तथा प्रशासक डॉ.प्रवीण गेडाम यांनी दिले आहे. बर्फी प्रसाद निर्मितीसाठी शिर्डी देवस्थानाच्या धर्तीवर रीतसर प्रक्रिया करून पुरवठादार निवडण्यात आलेला आहे. यामुळे कामगार कायद्याचे पालन व सुलभतेने दर्जात्मक प्रसाद निर्मिती सुलभ होईल.

यापूर्वी बर्फीकरिता विशिष्ट ब्रँडची मक्तेदारी असल्याने देवस्थानचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले होते हे टाळण्यासाठी व देवस्थानला साहित्याचा पुरवठा विना अडथळा होण्यासाठी निविदाप्रक्रियेद्वारा विविध साहित्य खरेदी करण्यात येत आहे. यामुळे देवस्थानला स्पर्धात्मक दराचा फायदा होईल व प्रक्रिया पारदर्शकता राहील . भविष्यातील खरेदी प्रक्रिया ही ई टेंडरद्वारे राबविण्याबाबत शासन स्तरावर पत्रव्यवहार करून नोंदणी करण्यात आलेली आहे. बर्फी प्रसाद तयार करण्यासाठी यापूर्वी नियुक्त कारागीर यांची लेखी स्वरूपात नेमणूक करण्यात आलेली नव्हती. यासह सदरील बर्फी प्रसाद बनविण्यासाठी विशिष्ट ब्रँडचीच मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनस आलेले होते व त्यामुळे देवस्थान प्रशासनाला स्पर्धात्मक दराचा फायदा होत नव्हता. दरम्यान देवस्थान प्रशासनातर्फे या सुधारणा होत असतांना प्रसाद किंवा तेल विक्रीवर कोणताही परिणाम झालेला नाही हे मागील ३ महिन्याच्या आकडेवारीवरून स्पष्ट होतांना दिसते.

बर्फी प्रसाद विक्री

नोव्हेंबर:- ३ लाख १४ हजार ४५९ पाकिटे (रक्कम रु. ६२ लाख ८९ हजार १८० रुपये )

डिसेंबर : - ४ लाख ५२ हजार ८३५ पाकीटे ( रक्कम रु. ९० लाख ५६ हजार ७००)

जानेवारी : - ५ लाख १० हजार ६२६ पाकीटे (रक्कम रु. १ कोटी २ लाख १२ हजार ५२०)

तेल विक्री

नोव्हेंबर :- ३४ लाख ८४ हजार ९५४ रुपये

डिसेंबर :- ३३ लाख ८ हजार २६७ रुपये

जानेवारी;- ४६ लाख ५ हजार २४४ रुपये

वेतन बाबत जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांचे कडून नियुक्त लेखा अधिकाऱ्यांकडून कार्यालयीन तपासणी सुरू असून लवकरच कर्मचाऱ्यांचे वेतन करण्यात येईल.असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. देवस्थानचे कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत ते पारदर्शकरित्या आणि नियमानुसार व्हावे यावर प्रशासनाचा भर असून भाविकांचा त्रास कमी होऊन त्यांना चांगल्या सुविधा मिळाव्या यावरही भर दिला जात आहे. देवस्थानचे महात्म्य आणि पावित्र्य अबाधित राखण्यासाठी प्रशासनातर्फे आवश्यक सुधारणांवर भर दिला जात आहे.

# "हिरा घासल्याशिवाय चमकत नाही; विकासासाठी धडपड आवश्यक" : आ. काशिनाथ दाते सर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते कारेगाव येथे ३० लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण समारंभ संपन्न झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे १० लक्ष रुपयांच्या स्ट्रीट लाईट बसविणे, कारेगाव ते कासारे गाव जोड रस्ता करणे – १० लक्ष, तसेच पैसा रस्ता ते पांधी शिव रस्ता करणे – १० लक्ष अशी एकूण ३० लक्ष रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे ग्रामस्थांच्या दळणवळण व मूलभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होणार आहे.



या कार्यक्रमास विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष विजुभाऊ औटी, मा. जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, मतदारसंघाचे अध्यक्ष विजुभाऊ औटी,मा. चेअरमन बाबासाहेब खिलारी, कार्याध्यक्ष पंढरीनाथ उंडे, कार्याध्यक्षा सौ. वंदना घोलप, तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, गणप्रमुख देवराम मगर, मा. उपसरपंच महादेव पुंडे, गोपीनाथ घुले, मा. सरपंच संजिवनी आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच उपसरपंच अशोक पंडित, दत्ता घुले, साहेबराव खरात, विनायक घुले, मिनीनाथ शिर्के, गंगाराम घुले, बाजीराव घुले, अशोक खरात मेजर, सखाराम खरात, शरद जगदाळे, जालिंदर राजदेव, महेश गुंजाळ, राहुल घुले व महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले, "आपल्याला परिवर्तन हवे असते, नव्या गोष्टी शिकायच्या असतात आणि त्या माध्यमातून आपली कामे सुकर व्हावीत अशी अपेक्षा असते. मात्र आयते काहीही मिळत नाही. हिरा जसा घासल्याशिवाय चमकत नाही, तसेच ज्ञान, नवे शोध आणि प्रगती ही प्रयत्नांशिवाय साध्य होत नाही. अनेक ठोकरा खाव्या लागतात, पडावे लागते, तेव्हाच खरे शिक्षण मिळते आणि माणूस घडतो."

जनतेप्रती आत्मीयता व्यक्त करत त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा केवळ निधीपुरता मर्यादित नसून लोकांच्या सहभागातून, जिद्दीने आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांतून साध्य होतो.

कारेगावच्या विकासासाठी आपण कायम कटिबद्ध असून गावातील प्रत्येक घटकाच्या प्रगतीसाठी प्रयत्न सुरूच राहतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या विकासकामांमुळे कारेगावच्या पायाभूत सुविधांना नवी गती मिळणार असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# युनिव्हर्सल इंग्लिश स्कूलचा उत्सव उत्साहात!

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

जव्हार : आदिवासी व दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जव्हार येथे शैक्षणिक प्रगतीसोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी युनिव्हर्सल इंग्लिश स्कूल तर्फे 'उडान उत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. १३, १४ व १६ फेब्रुवारीदरम्यान झालेल्या या गुणदर्शन मालिकेत शाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. उद्घाटनप्रसंगी आमदार हरिश्चंद्र भोये, नगराध्यक्ष पूजा उदावंत, उपनगराध्यक्ष कुणाल उदावंत, आदर्श विद्यालय गोरेगावचे ट्रस्टी सखाराम सावरकर, राज्य कार्यक्रम अधिकारी हितेंद्र चौधरी तसेच पोलीस निरीक्षक विजय मुतडक उपस्थित होते. फॅन्सी ड्रेस, एकांकी नृत्य व समूह नृत्य स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर केले.

# दोन महिला उपनिरीक्षक असूनही शहरात टवाळखोर मोकाट; कारवाई मात्र शून्य!

**वसमत : (समर्थ गांवकरी)**

> ■ महिला फिरते पथकाचा पत्ता नाही; शाळा-महाविद्यालय परिसरात मुलींना त्रास, पालकांत संताप

वसमत शहरात पोलिसांचे महिला फिरते पथक सध्या प्रत्यक्षात दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. ग्रामीण भागातून शिक्षण, प्रशिक्षण तसेच खाजगी शिकवणी वर्गासाठी शहरात मोठ्या प्रमाणात मुलींची ये-जा असते. मात्र या मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस ऐरणीवर येत आहे.

शाळा व महाविद्यालयाच्या वेळेत शहरातील विविध भागांत टवाळखोर ट्रिपल सीट दुचाकीवरून फिरत असून कर्णकर्कश आवाजात हॉर्न वाजवत मुलींना त्रास देत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी छेडछाडीचे प्रकार घडत असल्याचेही बोलले जात आहे. मात्र भीतीपोटी अनेक मुली तक्रार देण्यास पुढे येत नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. एकीकडे पोलिस दलाकडून 'दामिनी पथक', 'चिडीमार पथक', 'महिला फिरते पथक', 'पोलीस दीदी' अशा विविध उपक्रमांची माहिती दिली जाते. मात्र वसमत शहरात या पथकांची प्रत्यक्ष उपस्थिती जाणवत नसल्याने नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे वसमत शहरात दोन महिला पोलीस उपनिरीक्षक कार्यरत आहेत. मात्र छेडछाड, टवाळखोरांचे प्रकार तसेच ट्रिपल सीट दुचाकींच्या दहशतीवर ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे. त्यामुळे "महिला सुरक्षेसाठी नेमकी कोणती पावले उचलली जात आहेत?" असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, शहरातील शाळा, महाविद्यालय परिसर, बसस्थानक परिसर तसेच मुख्य चौकात नियमित गस्त वाढवून टवाळखोरांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी पालकवर्गातून होत आहे. आता पोलीस अधीक्षकांकडून महिला उपनिरीक्षकांना शहरातील दोन भागांमध्ये जबाबदारी निश्चित करून कारवाईचे आदेश दिले जातील का, याकडे लक्ष लागले आहे.

# दुधनी शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील कुसापूर केंद्रातील जिल्हा परिषद दुधनी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन आज साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादर करत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन विविध कला सादर करून प्रेक्षकाची मने जिंकली. तसेच गाण्यातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. यावेळी भिवंडी तालुक्याचे माजी सभापती शांतारामदादा पाटील, ठाणे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा दिपालीताई पाटील , दुधनी ग्रामपंचायतीचे सरपंच लक्ष्मणदादा पाटील, दाभाड केंद्राचे केंद्रप्रमुख श्यामसुंदर दोंदे सर, यशोदा आई, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा रेश्माताई मलेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष



नरेशभाऊ जाधव, कुसापूर केंद्राचे माजी केंद्रप्रमुख नरेश भोईर सर , ठाणे व पालघर शिक्षक पतपेढीचे अध्यक्ष प्रशांतजी घागस सर,उपसरपंच हर्षदाताई पाटील मॅडम, पोलीस पाटील नम्रताताई भवर, दुधनी शाळेचे मुख्याध्यापक गजानन गायकवाड तसेच सहकारी शिक्षक पुनम गायकवाड व सतीश वाडीयार , कुसापूर व पाच्छापूर केंद्रातील शिक्षक, प्रकाश दळवी, पालक वर्ग, ग्रामस्थ मंडळी, शिक्षक वर्ग व दुधनी शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# 'एंजल वन सिल्व्हर ईटीएफ' आणि 'सिल्व्हर ईटीएफ एफओएफ' लॉँच

## चांदीत गुंतवणुकीसाठी दोन पर्याय; एनएफओ कालावधी जाहीर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

AngelOne®

एंजल वन अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने 'एंजल वन सिल्व्हर ईटीएफ' आणि 'एंजल वन सिल्व्हर ईटीएफ एफओएफ' या दोन नव्या गुंतवणूक योजनांच्या लॉँचची घोषणा केली आहे. या दोन्ही न्यू फंड ऑफर्स (एनएफओ) ९ फेब्रुवारीपासून गुंतवणुकीसाठी खुल्या झाल्या असून सिल्व्हर ईटीएफचा एनएफओ १९ फेब्रुवारीपर्यंत, तर एफओएफचा एनएफओ २३ फेब्रुवारीपर्यंत खुला राहणार आहे.

या योजनांद्वारे गुंतवणूकदारांना चांदीमध्ये (सिल्व्हर) थेट गुंतवणूक करण्याची संधी उपलब्ध होणार असून देशांतर्गत किमतींचा मागोवा घेणारी पारदर्शक व सोपी गुंतवणूक सुविधा दिली जाणार आहे. ईटीएफच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना एनएसईवर नियमित व्यवहार करता येणार असून एफओएफ योजनेत डिमॅट खाते नसतानाही गुंतवणूक शक्य होणार आहे. सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, डेटा सेंटर्स यांसारख्या क्षेत्रांत वाढणारी मागणी आणि मर्यादित पुरवठा यामुळे चांदीचे महत्त्व वाढत आहे. एएमएफआयच्या आकडेवारीनुसार डिसेंबर २०२५ मध्ये भारतातील सिल्व्हर ईटीएफचा एयूएम ७२ हजार कोटी रुपयांवर पोहोचला आहे. ३१ जानेवारी २०२६ पर्यंतच्या गेल्या दहा वर्षांत चांदीने (रुपयांमध्ये) सुमारे २५.८ टक्के सीएजीआर दराने वाढ नोंदवली आहे, ज्यामुळे पोर्टफोलिओ विविधतेसाठी आणि महागाईच्या काळात संरक्षणासाठी हा पर्याय उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येते. एंजल वन एएमसीचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर व सीईओ हेमेन भाटिया म्हणाले, "चांदी ही मौल्यवान धातू असण्याबरोबरच आधुनिक जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाची मालमत्ता म्हणून उदयास येत आहे. भावी उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रात वाढती मागणी पाहता दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी चांदी आकर्षक पर्याय ठरत आहे.

आमच्या सिल्व्हर ईटीएफ आणि एफओएफच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना पारदर्शक, सोपा आणि किफायतशीर मार्ग उपलब्ध करून देण्याचा आमचा उद्देश आहे." या दोन्ही योजना चांदीत गुंतवणुकीचा सोयीस्कर आणि किफायतशीर मार्ग उपलब्ध करून देतात.

**ठळक वैशिष्ट्ये**

- एंजल वन सिल्व्हर ईटीएफमध्ये एनएफओदरम्यान किमान १,००० रुपये आणि त्यानंतर १ रुपयांच्या पटीत गुंतवणूक करता येणार.
- एनएसईवर नोंदणीनंतर युनिट्सचा व्यवहार सुरू होऊन रिअल-टाइम किंमत व लिक्विडिटीची सुविधा मिळणार.
- स्टोरेज, शुद्धता पडताळणी आणि घडणावळ शुल्क यांसारख्या भौतिक चांदीच्या अडचणी टाळता येणार.
- एंजल वन सिल्व्हर ईटीएफ एफओएफ योजनेत किमान ५०० रुपयांपासून गुंतवणूक शक्य.
- डिमॅट खाते नसतानाही गुंतवणूक करण्याची सुविधा.
- एसआयपी अंतर्गत दैनंदिन गुंतवणुकीसाठी किमान २५० रुपये, साप्ताहिक/पाक्षिक/मासिक गुंतवणुकीसाठी ५०० रुपये आणि त्रैमासिक एसआयपीसाठी १,५०० रुपयांची किमान मर्यादा.

गुंतवणूक काढताना कोणतेही दंड किंवा शुल्क आकारले जाणार नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. या लॉँचमुळे एंजल वन एएमसीचा गोल्ड ईटीएफ व गोल्ड एफओएफसह निष्क्रिय गुंतवणूक उत्पादनांचा विस्तार होऊन इक्विटी, डेट आणि कमोडिटी मालमत्ता वर्गातील उपस्थिती अधिक मजबूत होणार आहे.